रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ११५
www.ramprahar.com
राम प्रहर
◆ बुधवार, १२ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

उरण पालिकेसाठी भाजपचे अर्ज उद्या होणार दाखल/३
बैलांना उडवल्यानंतर खोपोली लोकल ट्रॅकवरच अडकली/६
कळंबोली येथे रायगड जिल्हा अस्मिता ॲथलेटिक्स लीग/८

## एक्झिट पोल : बिहारमध्ये पुन्हा एनडीए सरकार सत्तेत येणार

**पाटणा :** बिहार विधानसभा निवडणुकीच्या एक्झिट पोल्सनी धमाका करून टाकला आहे. गेल्या



निवडणुकीत टफ फाईट देणाऱ्या तेजस्वी यादव यांना मोठ्या निराशेला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. दैनिक भास्कर, मॅट्रीझ, पीपल्स इनसाइट, चाणक्य स्ट्रॅटेजीज आणि पीपल्स पल्स यांसह सर्व प्रमुख एक्झिट पोल्सनी बिहारमध्ये पुन्हा एकदा एनडीएच्या विजयाचा अंदाज वर्तवला आहे. त्यानुसार एनडीएला १३० ते १६७ च्या दरम्यान जागा, तर महाआघाडीला ७३ ते १०८च्या दरम्यान जागा मिळतील. एकंदरीत एक्झिट पोल्समध्ये सत्ताधारी एनडीएला १४६ जागा आणि महाआघाडीला ९० जागा मिळतील, असा अंदाज वर्तवला गेला आहे. प्रशांत किशोर यांच्या जनसुराज्य पक्षाने खाते उघडण्याचे संकेत दिले असून या पक्षाने महाआघाडीचे गणित बिघडविले असल्याचे म्हटले जात आहे.

# हल्लेखोरांना सोडणार नाही!

## दिल्ली स्फोटावरून पंतप्रधान मोदींचा इशारा

**थिम्पू (भूतान) : वृत्तसंस्था**



भूतान दौऱ्यावर असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी (दि. ११) दिल्ली स्फोटावर शोक व्यक्त केला तसेच हल्लेखोरांना आणि षडयंत्रामागील व्यक्तींना सोडणार नाही, असा इशारा दिला आहे.

राजधानी दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ल्याजवळ मेट्रो स्थानकाबाहेर कारमध्ये शक्तिशाली सोमवारी स्फोट झाला होता. या स्फोटात आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला असून ३०हून अधिक लोक जखमी झाले आहेत. या पार्श्वभूमीवर भूतानमध्ये केलेल्या भाषणात पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज या प्रसंगी सहभागी होणे भारत व माझी बांधिलकी होती, पण मी इथे खूप भावनिक होऊन आलो आहे. काल संध्याकाळी दिल्लीत घडलेल्या भयावह घटनेने सगळ्यांना दुःखी केले आहे. मी पीडित कुटुंबीयांचे दुःख समजू शकतो. अख्खा देश त्यांच्यासोबत उभा आहे. मी काल रात्रभर या घटनेचा तपास करणाऱ्या सर्व यंत्रणा, महत्त्वपूर्ण व्यक्तींच्या संपर्कात होतो. चर्चा, माहितीची देवाण-घेवाण चालू होती. आमच्या तपास यंत्रणा या कारस्थानाच्या मुळापर्यंत जातील. हे कारस्थान करणाऱ्यांना आम्ही सोडणार नाही. जे कुणी या घटनेसाठी जबाबदार आहेत, त्यांना अद्दल घडवली जाईल.

दरम्यान, परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या निवासस्थानी उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीला केंद्रीय गृह सचिव, गुप्तचर विभागाचे प्रमुख, दिल्ली पोलीस आयुक्त, राष्ट्रीय तपास संस्थेचे महासंचालक उपस्थित होते. जम्मू काश्मिरच्या पोलीस महासंचालकांनी दूरस्थ पद्धतीने उपस्थिती दर्शविली. या घटनेचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे देण्याचा निर्णय घेण्यात आला.

### डॉक्टरांचे व्हाईट कॉलर टेरर मॉड्यूल; मौलवी मास्टरमाईंड

**नवी दिल्ली :** लाल किल्ल्याजवळ स्फोट होण्याच्या काही तास आधीच हरियाणा आणि जम्मू काश्मीर पोलिसांनी फरीदाबाद मॉड्यूलचा पर्दाफाश केला होता. यानंतर एकापाठोपाठ एक नावे समोर आली, ज्यात डॉ. मोहम्मद उमर, डॉ. मुजम्मिल शकील, डॉ. शाहीन शाहीद, डॉ. आदिल अहमद, डॉ. अहमद मोहिउद्दीन यांचा समावेश असल्याने त्याला व्हाईट कॉलर टेरर मॉड्यूल म्हणूनही म्हटले जात आहे. आता आणखी एक रिपोर्ट समोर आला आहे. यात फरीदाबाद मॉड्यूलचा खरा मास्टरमाईंड मौलवी इरफान अहमद असल्याचे बोलले जाते. जो जम्मू काश्मीरच्या शोपिया जिल्ह्यात राहणारा आहे. या सगळ्यांसह इतर संशयितांची कसून चौकशी केली जात आहे.



## स्वप्नपूर्ती हौसिंग सोसायटीला मिळणार विशेष बाब म्हणून नोंदणीची परवानगी

### सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांचे आश्वासन; आमदार प्रशांत ठाकूर यांचा पुढाकार

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील स्वप्नपूर्ती गृहनिर्माण संकुलातील स्वप्नपूर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था क्र. ९ (नियोजित) या संस्थेला विशेष बाब म्हणून नोंदणी करण्यास परवानगी देण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकारातून राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासोबत मंगळवारी (दि. ११) मंत्रालयात बैठक झाली. त्यानुसार गृहनिर्माण संकुलाच्या नोंदणीसंदर्भातील शासन स्तरावरील तांत्रिक अडचणी दूर करून या संस्थेच्या नोंदणीचा मार्ग मोकळा केला जाणार असल्याचे मंत्रीमहोदयांनी आश्वासित केले आणि त्यासाठी खास बाब म्हणून शिफारसही केली. त्यामुळे येथील रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

स्वप्नपूर्ती गृहनिर्माण संकुल स्थापन करण्यासाठी सिडकोकडून १६ जुलै २०२४ रोजी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. त्यानुसार संस्थेच्या मुख्य प्रवर्तकांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सिडको), बेलापूर यांच्याकडे १४ ऑगस्ट २०२४ रोजी नोंदणी प्रस्ताव सादर केला होता. तथापि, सहाय्यक निबंधकांनी त्यांच्या ३ ऑक्टोबर २०२४च्या पत्रान्वये एकूण सदनिकांपैकी ५१ टक्के खरेदीदार सदस्य नसल्यामुळे नोंदणी करता येणार नसल्याचे कळविले होते. त्यानंतर महाव्यवस्थापक गृहनिर्माण सिडको यांनी २३ जानेवारी २०२५ रोजी सिडकोचे सहाय्यक निबधंक यांना ५१ टक्के आवश्यक सदनिकासाठी उर्वरित विक्री न झालेल्या सदनिकांची मालकी सद्यस्थितीत सिडकोकडे असल्याने व या सदनिकांसाठी सिडकोची 'ना हरकत' गृहीत धरून एक विशेष बाब म्हणून संस्थेची नोंदणी करण्याबाबत कळविले होते, मात्र त्याची ठोस कार्यवाही न झाल्याने सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांना आमदार प्रशांत ठाकूर यांनी निवेदन देऊन या संदर्भात योग्य मार्ग काढण्यासाठी बैठकीची मागणी केली होती. त्या अनुषंगाने मंत्रीमहोदयांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली.

या बैठकीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत पनवेल-सिडको सहकारी गृहनिर्माण संस्था संघ मर्यादितचे अध्यक्ष कुंडलिक काटकर, स्वप्नपूर्ती सहकारी गृहनिर्माण संस्थेचे मुख्य प्रवर्तक अशोक जाधव तसेच सिडकोचे जॉईंट रजिस्टार श्री. वीर, सहाय्यक निबंधक शंकर पाटील आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या महत्त्वपूर्ण बैठकीत गृहसंकुल व रहिवाशांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा झाली असून लवकरच या संस्थेच्या नोंदणीसाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याचे मंत्रीमहोदयांनी आश्वस्त केले आहे.

## शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी!

### कृषी विभागाच्या नव्या बोधचिन्ह, घोषवाक्याचे अनावरण



**मुंबई :** राज्य कृषी विभागाच्या नवीन बोधचिन्हाचे तसेच शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी या नवीन घोषवाक्याचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत मंगळवारी (दि. ११) सह्याद्री अतिथीगृह येथे करण्यात आले.

कार्यक्रमास महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, क्रीडामंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश कुमार, कृषी आयुक्त सूरज मांढरे, उपसचिव प्रफुल्ल ठाकूर, संचालक रफिक नाईकवाडी, कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या वेळी बोधचिन्ह स्पर्धेतील विजेता आणि घोषवाक्य स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

## राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये महाराष्ट्र सर्वोत्कृष्ट

**नवी मुंबई महापालिका स्थानिक स्वराज्य संस्था गटात प्रथम**

**नवी दिल्ली :** केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या जलसंसाधन, नदीविकास व गंगा संरक्षण विभागातर्फे जलसंरक्षण व जलव्यवस्थापनातील उत्कृष्ट कामगिरीला प्रोत्साहनासाठी देण्यात येणारे सहावे राष्ट्रीय जल पुरस्कार (२०२४) जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये सर्वोत्कृष्ट राज्य श्रेणीत महाराष्ट्राने प्रथम क्रमांक मिळवला असून गुजरात दुसऱ्या, तर हरियाणा तिसऱ्या स्थानी आहे. स्थानिक स्वराज्य संस्था गटात नवी मुंबई महापालिकेने प्रथम पुरस्कार, तर पाणी वापर संस्थांमध्ये नाशिकच्या कानिफनाथ संस्थेने व्दितीय क्रमांक पटकावला आहे. केंद्रीय जलशक्तीमंत्री सी.आर. पाटील यांनी या पुरस्कारांची घोषणा केली. पुरस्कार वितरण येत्या १८ नोव्हेंबरला नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत होईल. यंदा १० विविध श्रेणींमध्ये संयुक्त विजेत्यांसह एकूण ४६ संस्था व व्यक्तींना पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

## निवडक

### पाकिस्तानातही कारमध्ये स्फोट; १२ जणांचा मृत्यू

**इस्लामाबाद :** पाकिस्तानच्या इस्लामाबाद



हायकोर्टाबाहेर एका कारमध्ये भीषण स्फोट होऊन १२ जणांचा मृत्यू, तर २५ जण जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत. या घटनेनंतर पोलिसांनी कोर्ट व आजूबाजूचा परिसर सील करून तपास सुरू केला आहे.

### कोल्हापुरात बिबट्याचा धुमाकूळ, चार जण जखमी

**कोल्हापूर :** येथे भरवस्तीत मंगळवारी (दि. ११) बिबट्याने एन्ट्री घेतल्याने एकच खळबळ उडाली. त्याला पकडण्यात तीन तासांहून अधिकचा काळ लागला. या सगळ्या बचावकार्यात चार जण जखमी असल्याची माहिती आहे. अखेर बिबट्याला पकडून एका लोखंडी जाळीत घालून व्हॅनपर्यंत नेण्यात आले. त्यानंतर सुरक्षितस्थळी हलवण्यात आले. मग सर्वांनी सुटकेचा नि:श्वास टाकला.

## पनवेल महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण जाहीर




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५च्या आरक्षण निश्चितीसाठी मंगळवारी (दि. ११) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सोडतीचे आयोजन करण्यात आले होते. या सोडतीद्वारे एकूण २० प्रभागांतील अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांचे आरक्षण जाहीर करण्यात आले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या सोडतीस अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, महेशकुमार मेघमाळे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, नानासाहेब कामठे, प्रसेनजित कारलेकर, वैभव विधाते, सचिव अक्षय कदम, कार्यकारी अभियंता सुधीर साळुंखे, आरेखक नितीन हुद्दार, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर तसेच माजी नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

प्रारूप आरक्षणावर विहीत नमुन्यात हरकती व सूचना मागविण्यासाठी १७ नोव्हेंबरपर्यंत अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हरकती व सूचना मागविण्याची अंतिम तारीख २४ नोव्हेंबर असणार आहे तसेच २ डिसेंबर रोजी अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येणार आहे. **(प्रभागनिहाय आरक्षण पान २ वर..)**

## महाडमध्ये वृद्धावर वानराचा हल्ला

**महाड : प्रतिनिधी**

महाड ग्रामीण भागात वानर जातीच्या माकडांचा वावर वाढला असून खाडीपट्ट्यातील बेबलघर येथील रहिवासी नारायण विश्राम चिबडे (वय ८१) यांना एका माकडाने हल्ला करून जखमी केल्याची घटना घडली. चिबडे यांना चिंभावे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारानंतर महाड ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले आहे.



नारायण चिबडे हे सोमवारी (दि. १०) दुपारी घरामध्ये बसले असताना एका वानराने घरात येऊन त्यांच्यावर हल्ला चढवला. यामध्ये डाव्या हातावर मोठा चावा घेतल्यामुळे मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये महाडच्या खाडीपट्ट्यात वानर जातीच्या माकडांचा उपद्रव वाढला आहे. त्यांचा वनखात्याने बंदोबस्त संबंधित वन करावा, अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे.

### भरधाव कंटेनर वारकऱ्यांच्या दिंडीत घुसला

## महिलेचा मृत्यू, आठ जण जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

उरण येथून आळंदीच्या कार्तिकी एकादशी वारीला निघालेल्या वारकऱ्यांच्या दिंडीत भरधाव कंटेनर घुसल्याने महिलेचा मृत्यू झाला असून आठ जण जखमी झाले आहेत. हा अपघात मंगळवारी (दि. ११) सकाळी ६च्या सुमारास कामशेत घाटात घडला. मंजुळा तांडेल (वय ५३, रा. करळ, उरण) वर्षे असे मृत झालेल्या महिला वारकऱ्याचे नाव आहे.





मिळालेल्या माहितीनुसार उरण येथील दिंडी आळंदीच्या कार्तिकी वारीसाठी निघाली होती. ही दिंडी सकाळी मुंबई-पुणे महामार्गावरील कामशेत घाटात असताना चालकाचे नियंत्रण सुटलेला भरधाव कंटेनर दिंडीत शिरला. या कंटेनरने वारकऱ्यांना धडक दिली. त्यात वारकरी महिला मंजुळा तांडेल यांचा मृत्यू झाला असून आठ वारकरी जखमी झाले. जखमींना तत्काळ जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरू असून प्रकृती स्थिर आहे.

या अपघातानंतर घटनास्थळी तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. कामशेत परिसरातील ग्रामस्थांनी तसेच दिंडीकऱ्यांनी ठिय्या देत मुंबई-पुणे महामार्ग रोखून धरला. त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. या ठिकाणी वारंवार होणारे अपघात रोखण्यासाठी उड्डाणपूल किंवा भुयारी मार्ग व्हावा, अशी मागणी या वेळी करण्यात आली. पोलिसांनी कंटेनरचालकाला ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरू आहे.

दरम्यान, खासदार श्रीरंग बारणे यांनी घटनास्थळी पाहणी करून रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली तसेच आमदार सुनील शेळके यांनीही आढावा घेतला.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**




(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगडच्या वतीने, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या सहकार्याने आणि महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित योनेक्स सनराईज द्वितीय महाराष्ट्र सिनिअर स्टेट सिलेक्शन रामशेठ ठाकूर ट्रॉफी बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन मंगळवारी (दि. ११) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उत्साहात झाले.

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये ही स्पर्धा खेळली जात आहे. उद्घाटन समारंभास प्रमुख मान्यवर म्हणून कामगार नेते महेंद्र घरत, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे जनरल सेक्रेटरी वाय.टी. देशमुख, महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनचे सेक्रेटरी आशिष वाजपेयी, कोर्ट ऑफिशियल कमिटीचे चेअरमन विश्वास देसवंडीकर, योनेक्स सनराईजचे बालकृष्णन चौधरी, स्पर्धेचे संयोजक व बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगडचे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अनिरुद्ध पाटील, उपाध्यक्ष रवींद्र भगत, शिवकुमार करयिल, सेक्रेटरी डेव्हिड अल्वारिस, खजिनदार नरेंद्र जोशी, रेफरी विनय जोशी, नाशिक बॅडमिंटन असोसिएशनचे सेक्रेटरी पराग एकांदे, अहिल्यानगर बॅडमिंटन असोसिएशनचे सेक्रेटरी मिलिंद कुलकर्णी, श्रीशैल मिटकरी, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ.एस.टी. गडदे, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र म्हात्रे, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, विजय घरत, अनंता ठाकूर, निलेश खारकर, सी.एल. ठाकूर, अमर म्हात्रे, अंकुश ठाकूर, योगिता भगत, प्रतीक गोंधळी, श्यामनाथ पुंडे, योगेश पाटील यांच्यासह खेळाडू व बॅडमिंटनप्रेमी उपस्थित होते.

क्रीडा ही शिस्त, आत्मविश्वास आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे. खेळाडूंनी या स्पर्धेचा उपयोग आपल्या खेळगुणांचे प्रदर्शन करण्यासाठी आणि राज्याचे नाव उज्ज्वल करण्यासाठी करावा, असे सांगून सर्व खेळाडूंना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्पर्धेसाठी आणि पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेच्या आयोजनासाठी बॅडमिंटन संघटनेचे पदाधिकारी, प्रशिक्षक व स्वयंसेवकांनी उत्कृष्ट नियोजन केले आहे. ही स्पर्धा १५ नोव्हेंबरपर्यंत म्हणजेच पाच दिवस चालणार असून राज्यातील विविध जिल्ह्यांमधील सुमारे ३०० सर्वोत्तम खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. **(पान २ वर..)**

## रायगडात गुलाबी थंडी अन् धुक्यामुळे वातावरण आल्हाददायक

**अलिबाग : प्रतिनिधी**



गर्द हिरवी झाडी, विस्तीर्ण समुद्र किनारा आणि सह्याद्रीच्या लांब रांगा अशा निसर्ग सौंदर्याने नटलेल्या रायगड जिल्ह्यात गारेगार थंडीला सुरुवात झाली आहे. पहाटे सर्वत्र दाट धुके पसरत आहे, तर संध्याकाळीही गारवा वाढत चालला असून वातावरण आल्हाददायक बनले आहे.

या वर्षीच्या हंगामात मे महिन्यापासून सुरू झालेला पाऊस नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत लांबला. मध्यंतरीच्या काळात काही दिवस पावसाने विश्रांती घेतली तेव्हा ऑक्टोबर हिटने आठवडाभर वातावरण तापले होते. त्यानंतर पुन्हा वातावरणात झालेल्या बदलामुळे अवकाळी पाऊस बरसला. यंदा पावसाचा मुक्काम वाढल्याने थंडीची चाहूल थोडी उशिराच लागली.

नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात जिल्ह्यात सर्वत्र तापमानाचा पारा खाली आला आहे. सध्या जिल्ह्यातील किमान तापमान २१ ते २३ अंश, तर कमाल तापमान ३१ ते ३२ अंश सेल्सिअसपर्यंत जात आहे. खऱ्या अर्थाने आता गुलाबी थंडीला सुरुवात झाली आहे. सकाळी व रात्री वातावरण थंड असते, तर अनेक ठिकाणी दाट धुके पडलेले पहायला मिळते.

### वाहतूक धिम्या गतीने

मुंबई-गोवा महामार्गावर तसेच वाकण-पाली-खोपोली मार्गावर सकाळी पडलेल्या दाट धुक्यामुळे चालकांना वाहन चालवताना अडचणी येतात. मुंबई-गोवा महामार्गाचे काम सुरू असल्याने रस्त्यावरील दुभाजक, खड्डे, फलक, माती-दगड यांचा अडथळा येतो. त्यामुळे अपघाताचा धोका संभवतो. पहाटे पडलेल्या दाट धुक्याने वाहनचालकांना समोरील रस्ता व वाहने नीट दिसत नाही. परिणामी वाहतूक धिम्या गतीने सुरू असते.

# सांबरकुंड धरणातील मोठा अडसर दूर

## ■ २६३ हेक्टर वनजमीन जलसंपदा विभागाकडे हस्तांतरीत

**अलिबाग : प्रतिनिधी**

चार दशकांच्या प्रतिक्षेनंतर अलिबाग तालुक्यातील प्रस्तावित सांबरकुंड धरणातील मोठा अडसर दूर झाला आहे. २६३ हेक्टर वनजमिन जलसंपदा विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. त्यामुळे लवकरच धरणाच्या कामाला गती मिळेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

अलिबाग तालुक्यातील शेतजमिन सिंचनाखाली यावी तसेच तालुक्यातील पाणी प्रश्न सुटावा यासाठी १९८२ साली या धरणाच्या कामाला मंजूरी देण्यात आली होती. मात्र निरनिराळ्या कारणांनी धरणाचे काम रखडले होते. यात वनजमिनींचा मोठा अडसर होता. तो आता दूर झाला आहे. अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांनी सांबरकुंड



मध्यम सिंचन प्रकल्पासाठी २६३ हेक्टर वनजमिन वगळण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे सादर केला होता. त्यास मंजूरी देण्यात आली आहे. यानंतर ६ नोव्हेंबर २०२५ रोजी वनजमिन हस्तारणाचे आदेश वनविभागाने जारी केले आहे.त्यामुळे तब्बल चार दशकांच्या प्रतिक्षेनंतर धरणाच्या कामाला सुरूवात होऊ शकणार आहे. पुण्यातील महालक्ष्मी इंटरप्रायझेस या कंपनीला धरणाच्या कामाचा ठेका देण्यात आला आहे. धरणाच्या बांधकामासाठी जवळपास २ हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. प्रकल्पासाठी जांभूळवाडी, खैरवाडी, सांबरकुंडवाडी येथील १०३ हेक्टर जागेचे भूसंपादन करण्यात आले आहे. धरणाची लांबी ७३० मीटर असून उंटी ३८.७८ मीटर असणार आहे. ज्यात ४९.८५ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा केला जाणार आहे. प्रकल्पामुळे ४ हजार ३१४ हेक्टर जमिनी सिंचनाखाली येणार असून, २४ गावांना पाणी पुरवठा केला जाणार आहे.

विस्थापित कुटूंबांचे रामराज येथील राजेवाडी येथे पुनर्वसन केले जाणार आहे. यासाठी १६ हेक्टर भुखंड उपलब्ध करून देण्यात आला असून त्यावर सुमारे तीनशे घरे बांधून दिली जाणार आहेत.

# नवी मुंबई पालिकेवर असणार महिलांचे राज्य

**नवी मुंबई : बातमीदार**

येथील महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिला यांच्यासाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढण्यात आली. वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात सोडत प्रक्रिया पार पडली.



याबाबत हरकती आणि सूचना प्राप्त झाल्यानंतर आरक्षणाची अंतिम सूचना प्रसिध्द करण्यात येणार आहे. १११ सदस्यांपैकी ५६ महिला सदस्य नवी मुंबई महापालिकेत निवडून दिले जाणार आहेत, तर महापौरपददेखील महिला खुल्या गटात राहणार आहे. याशिवाय सर्वसाधारण जागांवर महिला उमेदवार दिला महिलांची संख्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक होण्याची शक्यता आहे. यंदाचे महापौर पदाचे आरक्षण देखील महिला खुल्या गटासाठी असल्याने यंदा नवी मुंबई पालिकेवर महिला राज दिसून येणार आहे.

२०११च्या जनगणनेनुसार नवी मुंबई महापालिका क्षेत्राचे एकूण लोकसंख्या ११ लाख ३६ हजार १७० असून अनुसूचित जातींची लोकसंख्या एक लाख ८३९ तर अनुसूचित जमातीची लोकसंख्या १९ हजार ६४६ निर्देशित करण्यात आली आहे. २८ प्रभागातून १११ सदस्य आगामी निवडणुकीत निवडून द्यायचे आहेत. १७ नोव्हेंबर रोजी आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्यात येणार आहे. तर, १७ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर दुपारी ३पर्यंत आरक्षणाबाबत हरकती व सूचना सादर कराव्यात.

### अशी राहणार आरक्षणाची मर्यादा

नवी मुंबई महापालिकेत एकूण २८ प्रभाग आहेत. त्यापैकी २७ प्रभाग हे चार सदस्यीय असून एक प्रभाग क्रमांक २८ हा तीन सदस्यीय असणार आहे. या २८ प्रभागातून एकूण १११ सदस्य निवडले जाणार आहेत. यापैकी, अनुसूचित जाती १० जागांपैकी (महिला) साठी ५ प्रभाग राखीव ठेवण्यात आले आहेत. अनुसूचित जमातीसाठी २ जागा १ महिला १ पुरुष आरक्षण ठेवण्यात आले. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी २९ पैकी नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला करिता १५ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सर्वसाधारण पुरुष व महिलांसाठी ७० जागा महिलांसाठी ३५ जागा राखीव आहेत.

# सर्वे येथील अंतर्गत रस्ता नूतनीकरण भूमिपूजन उत्साहात

**रेवदंडा : प्रतिनिधी**

उसरोली जिल्हा परिषद गटात समावेश असलेल्या मुरूड तालुक्यातील सर्वे या गावाच्या अंतर्गत रस्ता नुतनीकरणाचे भुमिपुजन कार्यक्रम सोहळा उत्साहात संपन्न झाला.

या प्रसंगी आमदार महेंद्र दळवी यांची प्रमुख उपस्थिती होती, तसेच भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस अँड महेश मोहिते,उसरोली ग्रामपंचायतीच्या संभाव्य जि.प.उमेदवार अँड मनस्वी मोहिते, शिवसेना उपजिल्हा प्रमुख भरतशेठ बेलोसे, शिवसेना तालुका प्रमुख निलेश घाटवळ, संदिप पाटील, जेष्ठ कार्यकर्ते सि.एम. ठाकूर, उपतालुका प्रमुख भगिरथ पाटील, भाजपचे संदिप चिरायू, दिशा कासार, महेंद्र चौलकर, गणेश कट, शेषनाथ कानुगोजे, अमर सोंडेकर, राजेंद्र सुतार, जनार्दन खोत,



जितेंद्र सकपाल, विकास म्हात्रे, मयुर मानकर, निलेश चवरकर, नितिन आर्डे, राकेश तांबडे, सुशिल चवरकर, अशोक वाघमारे तसेच मोठ्या संख्येने मुरूड तालुका शिवसेना व भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थित यावेळी होती.

भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस अँड महेश मोहिते यांचे पाठपुराव्याने सर्वे गावातील अंतर्गत रस्ता नुतनीकरणाचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. सर्वे ग्रामस्थांनी भाजपचे अँड महेश मोहिते यांचेकडे रस्ता नुतनीकरणाची मागणी केली होती. त्यानुसार सर्वे गावात जाणे–येणेसाठी असलेला मुख्यः अंतर्गत रस्ता नुतनीकरण होत आहे.

ग्रामस्थांचे वतीने यावेळी अँड महेश मोहिते व उसरोली जि.प. मतदार संघाच्या संभाव्य उमेदवार अँड मनस्वी मोहिते यांचे सत्कार करण्यात आला.

### रोहा पालिका निवडणुकीसाठी दुसऱ्या दिवशीही एकही उमेदवारी अर्ज दाखल नाही!

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगरपरिषद निवडणूक जाहीर झाल्यानंतर निवडणुकीचे उमेदवारी अर्ज दाखल १० नोव्हेंबर पासून सुरू झाले आहे.१० नोव्हेंबर रोजी एकही उमेदवारी अर्ज दाखल झाले नव्हते.दुसऱ्या दिवशी ११ नोव्हेंबर रोजी ही एकही उमेदवारी अर्ज दाखल झाले नाही. दोन दिवसात रोहा अष्टमी नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल झाले नाहीत.

रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या २० सदस्य पदासाठी व एक थेट नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची सुरुवात झाली आहे. परंतु अद्यापही दोन दिवसात एकही उमेदवारी अर्ज दाखल झाले नाही. १७ नोव्हेंबर पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख आहे. त्यामुळे येत्या ६ दिवसात राजकीय पक्षाकडून किती उमेदवारी अर्ज दाखल होतील हे पाहावयासे लागणार आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसीलदार किशोर देशमुख, सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून मुख्याधिकारी अजयकुमार एडके व नायब तहसीलदार मोकल हे काम पाहत आहेत.

# भात कापणीला मजुरांचा जाणवतोय अभाव; शेतकरी हैराण



**मुरुड : रामप्रहर वृत्त**

परतीच्या पावसात काही ठिकाणी पिकांची नासाडी झाल्याने बळीराजावर संकट निर्माण झाले असले तरी सुद्धा बळीराजा भात कापणी करण्यात व्यस्त झाला आहे.

मात्र शेतमजुरांच्या कमतरतेमुळे आज ही शेतीची कामे खोळंबली असुन मजुरांची मनधरणी करुन भात कापणीसाठी सुरवात झाल्याचे तालुक्याच्या ठिकाणी पहावयास मिळत आहे. दिवसेंदिवस वातावरणात गारवा प्रमाण वाढत असल्यामुळे भाताच्या लोंब्यापासुन भाताचे दाणे अलग होत आहेत. यावर्षी पीक उत्तम आले परंतु यावेळी पावसाने सम्पूर्ण नाश झाले , असुन हातात हवे तेवढे धान्य मिळणार नाही की नाही अशी स्थिती बळीराजाची झाली आहे.बळीराजा निसर्गाच्या लहरीपणावर मात करून भातपीके जोमाने वाढवून शेतजमीन फुलवून धान्य निर्माण करीत आहे. परंतु परंपरागत कामे करणारे शेतमजुर तसेच अनेक भागातून येणारे मजुरांवर भातपीकांची कापणीसाठी ही प्रामुख्याने अवलंबून असते परंतू स्थानिक शेतमजुरांची दिवसेंदिवस कमी होत असलेली संख्या त्यामुळे शेतमजुरांची तुटवडा जाणवत आहे.

पंचक्रोशी भागातून येणारे मजुर हे दिवाळीपुर्वी मिळतात जे उपलब्ध होतील त्यांची मनधरणी करून लवकरात लवकर भातकापणीला आटोपून घेण्याच्या प्रयत्नात शेतकरीवर्ग आहे. दिवसभरांतील कडक उन्हामुळे शेतमजुर हैराण होत असल्यामुळे या भात कापणीकडे पाठ फिरवत आहे.त्यातच भातामधील तांदुळाचे दाणा टणक बनुनी दाणा तुटण्याची शक्यता अधिक असल्याने ठराविक वेळेत भातकापणीला झाली नाही.तर शेतक–यांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागणार आहे.तर काही ठिकाणी भात जोडणी प्रारंभ झालेला आहे.

# बीकेसीत जागतिक दर्जाचे वस्तुसंग्रहालय होणार -मंत्री शेलार

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

देशाला अभिमान वाटावा असे जागतिक दर्जाचे वस्तूसंग्रहालय महाराष्ट्र सरकार बांद्रा येथील बीकेसीत उभारणार आहे. मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित वार्तालापात राज्याचे माहिती, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्यमंत्री भाजप नेते आशिष शेलार यांनी ही घोषणा केली. या संग्रहालयासाठी जमिनीचे अधिग्रहण पूर्ण झाले असून त्यासाठी मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे आभार मानतो, असे शेलार म्हणाले.

या वेळी मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर, राजेंद्र हुंजे, विश्वस्त देवदास मटाले आणि अजय वैद्य व्यासपीठावर उपस्थित होते.



मराठीचा अभिजात दर्जा आणि वारसा जोपासणाऱ्या दिवाळी अंकांसाठी अनुदान देण्यात यावे, अशी विनंती करणारे निवेदन मंत्री शेलार यांना या वेळी मुंबई मराठी पत्रकार संघ, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, ग्रंथाली, दिवा प्रतिष्ठान दिवाळी अंक प्रकाशक संघ यांच्या वतीने देण्यात आले.

या वार्तालापात महाविकास आघाडीतील पक्षांवर, विशेषतः शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेवर (मनसे) शेलार यांनी जोरदार शब्दांत हल्लाबोल केला. उद्धव ठाकरे यांची सेना आणि मनसे मुस्लिम मतांसाठी हातमिळवणी करत आहेत. हे दोन्ही पक्ष मतांसाठी कोणत्याही पातळीवर जाण्यास तयार आहेत.' असे शेलार म्हणाले.

### ज्ञानेश्वरीचा प्रसार माझा संकल्प

राजकारणाच्या चर्चेनंतर आपल्या सांस्कृतिक उपक्रमांचा उल्लेख करत शेलार म्हणाले, 'ज्ञानेश्वरी जगभर पोहोचवण्यासाठी माझे प्रयत्न सुरू आहेत. संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचा प्रसार हा माझा संकल्प आहे. महाराष्ट्राची संस्कृती, संतपरंपरा आणि मराठी भाषेचा अभिमान जगभर पोहोचवणे हेच माझे ध्येय आहे.'

# तळा तालुक्यात थंडीची चाहूल

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुका हा वृक्षलतांनी निसर्ग सौंदयनि नटलेल्या तळा तालुक्यात थंडीची सुरुवात होत आहे. पहाटे सर्वत्र दाट धुके पसरत आहे. पहाटे आणि संध्याकाळी गारवा वाढत चालला असून धुक्यामुळे वातावरण आल्हाददायक वाटत आहे. यावर्षीच्या हंगामात मे महिन्यापासून सुरू झालेला पाऊस नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यत लांबला होता.

ऑक्टोबर मधे काही दिवस पावसाने विश्रांती घेतली त्यावेळी आठवडाभर ऑक्टोबर



हिटने वातावरण तापले होते. त्यानंतर पुन्हा वातावरणात झालेल्या बदलामुळे पुन्हा अवकाळी पाऊस पडला. यंदा पावसाचा मुक्काम वाढल्याने ऑक्टोंबर अखेरच्या आठवड्यापासून पडणाऱ्या थंडीची चाहूल उशिरा लागायला सुरुवात झाली आहेगुलाबी थंडी म्हणजे हवामानातील सौम्य आणि आल्हाददायक थंडी, जी साधारणपणे हिवाळ्याच्या सुरुवातीला जाणवते. या काळात तापमान कमी होते आणि थंड वारे वाहू लागतात. ज्यामुळे सकाळसंध्याकाळच्या वेळी गारवा जाणवतो. पण दिवसा हवामान सुखद राहते.

नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात जिल्ह्यासह तालुक्यात सर्वत्र तापमानाचा पारा खाली आला आहे.ग्रामीण भागात थंडीचे वातावरण अनुभवायला मिळत आहे.या काळावधीत आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**पान १ वरुन**

## पनवेल महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण जाहीर

**पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५**

प्रभाग निहाय आरक्षण तक्ता

| अ.क्र | प्रभाग | जागा क्र अ | जागा क्र ब | जागा क्र क | जागा क्र ड |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | ना.मा.प्र | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण |
| 2 | 2 | ना.मा.प्र | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण |
| 3 | 3 | अनुसूचित जमाती (महिला) | ना.मा.प्र | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण |
| 4 | 4 | ना.मा.प्र. (महिला) | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण | सर्वसाधारण |
| 5 | 5 | ना.मा.प्र. (महिला) | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण | सर्वसाधारण |
| 6 | 6 | अनुसूचित जाती (महिला) | ना.मा.प्र | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण |
| 7 | 7 | ना.मा.प्र | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण |
| 8 | 8 | ना.मा.प्र. (महिला) | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण | सर्वसाधारण |
| 9 | 9 | अनुसुचित जमाती | ना.मा.प्र. (महिला) | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण |
| 10 | 10 | ना.मा.प्र. (महिला) | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण | सर्वसाधारण |
| 11 | 11 | अनुसूचित जाती (महिला) | ना.मा.प्र | सर्वसाधारण | |
| 12 | 12 | अनुसुचित जाती | ना.मा.प्र. (महिला) | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण |
| 13 | 13 | अनुसूचित जाती (महिला) | ना.मा.प्र | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण |
| 14 | 14 | ना.मा.प्र. (महिला) | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण | सर्वसाधारण |
| 15 | 15 | अनुसुचित जाती | ना.मा.प्र. (महिला) | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण |
| 16 | 16 | ना.मा.प्र. (महिला) | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण | सर्वसाधारण |
| 17 | 17 | अनुसुचित जाती | ना.मा.प्र. (महिला) | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण |
| 18 | 18 | ना.मा.प्र. (महिला) | ना.मा.प्र. | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण |
| 19 | 19 | ना.मा.प्र | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण |
| 20 | 20 | ना.मा.प्र | सर्वसाधारण ( महिला ) | सर्वसाधारण ( महिला ) | |

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन

पुरुष एकेरी, महिला एकेरी, पुरुष दुहेरी, महिला दुहेरी आणि मिश्र दुहेरी अशा गटांमध्ये सामने खेळवले जात आहेत.

या स्पर्धेतील विजेते, उपविजेते आणि उपांत्य फेरीतील खेळाडूंना एकूण चार लाख रुपयांची रोख पारितोषिके, चषक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे तसेच रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे संस्थापक लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वतीने अंतिम फेरीतील खेळाडूंसाठी अतिरिक्त दीड लाख रुपयांचे विशेष रोख पारितोषिक देण्यात येणार आहे.

स्पर्धेचा अंतिम सामना आणि समारोप समारंभ १५ नोव्हेंबर रोजी आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या समारंभात विजेत्या खेळाडूंना बक्षिसे प्रदान करण्यात येतील. स्पर्धेला सुरुवातीपासूनच खेळाडू, पालक आणि प्रेक्षकांचा मोठा उत्साह लाभत असून उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये उत्कृष्ट सुविधा व दर्जेदार व्यवस्थेमुळे खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचा अनुभव मिळत आहे.


**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

दुरध्वनी क्र. : ०२२–२७४५८०४०/४१/४२. फॅक्स नं. : ०२२–२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२–२७४५५७५१ उपायुक्त कार्यालय : ०२२–२७४५२३३९
Email Id : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.५८३/६०४/२०२५ दिनांक : ११/११/२०२५

**जाहीर निवेदन**

पनवेल महानगरपालिकेच्या नागरिकांना कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालय येथील जनहित याचिका क्र. ७१/२०१३ मध्ये दि. १३/१०/२०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार पनवेल महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिकेमार्फत विकसित केलेल्या रस्त्यांवरील खड्डयांमुळे व उघड्या मॅनहोल मुळे अपघातामध्ये कोणी जखमी झाल्यास त्यांनी अथवा अपघातामध्ये एखाद्यास जीव गमवावा लागल्यास त्यांचे नातेवाईकांनी शहर अभियंता कार्यालय, तिसरा मजला, पनवेल महानगरपालिका, देवाळे तलाव समोर, गोखले हॉलजवळ, स्वामी नित्यानंद मार्ग, पनवेल, जि. रायगड – ४१०२०६ या ठिकाणी सर्व पुराव्या निशी अर्ज सादर केल्यास मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या समिती मार्फत योग्य ती कार्यवाही करुन संबंधितांस मोबदला अदा करण्यात येईल, याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी.

**सही/–**
**आयुक्त**
पनवेल महानगरपालिका

# कामोठे येथे दैनिक बाजारांचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिडकोचा अनेक ठिकाणचा विकास हा फक्त कागदावर होता, मात्र पनवेल महापालिके स्थापन झाल्यानंतर तो विकास प्रत्यक्षात उतरतोय आणि भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून आपण सर्व जण हा विकास वेगाने व्हावा यासाठी काम करत आहोत, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी कामोठे येथे दैनिक बाजारांच्या भूमिपूजनावेळी केले. तसेच पदाधिकारी आणि कार्यकर्ते हेच खऱ्या अर्थाने विकासाचे शिल्पकार आहेत गौरवोद्गार काढले.





पनवेल महापालिकेच्या वतीने कामोठेमध्ये पाच ठिकाणी दैनिक बाजार उभारण्यात येणार आहे. महापालिकेच्या आठ कोटी ८४ लाख सहा हजार ४८३ रुपयांच्या निधीमधून हे काम होणार आहे. हे काम मार्गी लागण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने पाठपुरावा केला होता. त्यानुसार हे काम मंजूर झाले असून या कामाचे भूमिपूजन माजी नगरसेवक दिलीप पाटील यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत सोमवारी झाले.

या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, दिलीप पाटील, कुसुम म्हात्रे, हेमलता गोवारी, जिल्हा चिटणीस विद्या तामखडे, कामोठे मंडळ सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, भाजप नेते प्रदीप भगत, राजेश गायकर, रवी गोवारी, भाऊ भगत, पल्लवी पाटील, सुरेखा लांडे, वर्षा शेलार, जैनकुमार डिंगोरे, मयूर मोहिते, संतोष म्हात्रे, चंद्रकांत कडू, सुरेश खरात, मनोहर शिंगाडे, तुलसा घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# प्रेयसीवर लैंगिक अत्याचार करून बदनामी; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

सीवूड्स येथील नामांकित महाविद्यालयातील २२ वर्षीय तरुणाने आपल्या प्रेयसीवर लैंगिक अत्याचार करून तिचे नग्नावस्थेतील फोटो सोशल मीडियावर व्हायरल केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ॲनेक्स जोशी (वय २२) असे या तरुणाचे नाव असून पनवेल शहर पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या घटनेतील पीडित तरुणी भायखळा येथे राहण्यास आहे, तर आरोपी ॲनेक्स जोशी सीवूड्स येथील महाविद्यालयात शिक्षण घेत असून त्याच महाविद्यालयाच्या वसतिगृहात तो राहत आहे. दोन वर्षांपूर्वी पीडित तरुणीची ओळख तिची मैत्रिण आणि

## फोटो सोशल मीडियावर केले व्हायरल

तिच्या प्रियकराच्या माध्यमातून ॲनेक्स जोशी याच्यासोबत झाली होती. ओळख हळूहळू मैत्रीतून प्रेमात परिवर्तित झाली. जानेवारी २०२४ मध्ये ॲनेक्स जोशी याने पीडित तरुणीला पनवेलमधील फॉरेस्ट कॉलनी परिसरातील एका हॉटेलमध्ये नेले. तेथे त्याने जबरदस्तीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यावेळी तिच्या नकळत नग्नावस्थेतील तिचे फोटो आणि व्हिडिओ काढले, असे पीडित तरुणीने आपल्या तक्रारीत नमूद केले आहे. काही दिवसांपूर्वी आरोपीने सदर फोटो सोशल मीडियावर व्हायरल केले.

या प्रकरणाची माहिती पीडितेच्या मैत्रिणीच्या प्रियकराच्या लक्षात आल्यानंतर त्याने त्याबाबत पीडित तरुणीला माहिती दिली. त्यानंतर पीडितेने ॲनेक्स जोशी याला जाब विचारला असता, त्याने उलट तिला धमकी दिली. यानंतर पीडित तरुणीने भायखळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपी ॲनेक्स जोशी याच्या विरुध्द बलात्कार, धमकी देणे आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे.

पनवेलमधील हॉटेलमध्ये झाल्याने हा गुन्हा पुढील तपासासाठी पनवेल शहर पोलीसांकडे वर्ग करण्यात आला आहे. पनवेल शहर पोलिसांनी या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन आरोपीचा शोध सुरू केला आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते नागझरी येथे अंगणवाडीचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील नागझरी येथे एल एस आर स्पेश्यालिटी ऑईल्स प्रायव्हेट लिमीटेड कंपनीच्या ६८ लाख रुपयांच्या सीएसआर फंडातून अंगणवाडी बांधण्यात आली आहे. या आंगणवाडीचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याहस्ते सोमवारी झाले.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आंगणवाडीचे चांगले बांधकाम आणि उत्कृष्ट सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच आंगणवाडीच्या भिंतीवर मुलांना जगाचे ज्ञान मिळेल अश्या प्रकारची सर्वसमावेशक माहिती भिंतीवर रेखाटण्यात आल्याबद्दल पेंटींगचे काम करणाऱ्याचे कातुक करून त्यांना १० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले.



या अंगणवाडीच्या उद्घाटनावेळी भाजप नेते एकनाथ देशकर, कृष्णाशेठ पाटील, भाजपचे उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, प्रकाश खैरे, अशोक साळुंखे, महेश पाटील, नितेश पाटील, अरविंद गोंधळी, पनवेल तालुका उत्तर युवा मोर्चा अध्यक्ष आशिष कडू, निवृत्ती म्हात्रे, भारत मात्रे, रूपेश म्हात्रे, श्रीनाथ पाटील, अतुल पाटील, मेघनाथ पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# केबलचोर अटकेत

**पनवेल :** पनवेल-उरण रेल्वे रेल्वे ट्रॅकला लागुन असलेले साईटवर गव्हाणफाटा परिसरात ३ लाख रुपये किमतीची कॉपर केबल चोरून नेणाऱ्या एका आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी अटक केली असून त्यांच्या आणखी तीन साथीदारांचा शोध पोलीस घेत आहेत.

आरोपी शिवप्रसाद गौतम (वय २०, रा. दिवाळे गाव) ह्याने अनिल, अवधेश व आणखी एका व्यक्तीने आपसात संगणमत करून पनवेल-उरण रेल्वे रेल्वे ट्रॅकला लागुन असलेले साईटवर गव्हाणफाटा परिसरात असलेली तीन लाख रुपये किमतीची ७७ मीटर लांबी असलेली कॉपर केबल कापुन नेली. तसेच L2D Boomer मशीनचेदेखील नुकसान केले.

याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांकडे तक्रार दाखल होताच पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे तसेच हेड कॉन्स्टेबल योगेश दिवेकर यांनी तांत्रिक तपास व गुप्त माहितीदाराच्या साथीने आरोपी शिवप्रसाद गौतम याला अटक केली. त्याच्या कडून पोलिसांनी ५६ हजार रुपये किमतीची १४ मीटर लांबीची कॉपर केबल तसेच पाच लाख रुपये किमतीची मारुती सुझुकी डिझायर गाडी जप्त केली आहे. त्यांच्या आणखी तीन साथीदारांचा शोध हेड कॉन्स्टेबल योगेश दिवेकर करीत आहेत.

# वैद्यकीय शिक्षणासाठी सानिया भोईरला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मदत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनी येथील सुभाष भोईर यांची कन्या सानिया भोईर हिला वैद्यकीय उच्च शिक्षणासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. हा धनादेश मंडळाचे संस्थापक, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी (दि.११) सुपूर्द करण्यात आला.



सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात गेल्या तीस वर्षांहून अधिक काळापासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन स्वतः च्या पायावर उभे केले जाते. सानिया भोईर हि एमबीबीएस हे वैद्यकीय शिक्षण एमजीएम महाविद्यालयात घेत असून तिला आर्थिक मदतीची आवश्यकता होती. आर्थिक अडचणीत असलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मदत करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी संधी उपलब्ध करून देणे, हा मंडळाचा नेहमीचा उद्देश राहिला आहे, त्यानुसार ही मदत करण्यात आली.

हा धनादेश सानियाची आई प्रतिभा भोईर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. या वेळी ज्ञानेश्वर बधे, नामदेव घरत, मंडळाचे कार्यालयीन सचिव अनिल कोळी आदी उपस्थित होते.

# दोन अपघातात दोघांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यात एका दिवसात घडलेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांत दोघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

अनिता मंगेश सरफरे (वय ४२, रा. वरळी कोळीवाडा) या आपल्या पतीसह दुचाने अलिबाग येथील आजारी वडिलांना भेटण्यासाठी सायन-पनवेल मार्गाने जात असताना त्यांच्या दुचाकीला कळंबोली येथील पुरुषार्थ पेट्रोल पंपाजवळ भरधाव डम्परने त्यांच्या जोरदार धडक दिली. यात अनिता सरफरे गंभीर जखमी झाल्या. त्यांना रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या अपघातानंतर कळंबोली पोलिसांनी डंपर चालक छोटन यादव याला अटक केली आहे.

दुसऱ्या घटनेत तळोजा येथील नावडे गावासमोरील रस्त्यावर मिलिंद भिकाजी सुरडकर (वय ५५) हे रस्ता ओलांडत असताना त्यांना अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. घडकेनंतर वाहन त्यांच्या अंगावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर वाहनचालक पसार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.



**पनवेल :** आझाद ज्येष्ठ नागरिक संघटनेचे पदाधिकारी नाना शामू कांबळे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाला विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, माजी उपमहापौर सीता पाटील, माजी नगरसेवक गणेश पाटील, भाजप नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, सरचिटणीस भीमराव पोवार, आझाद ज्येष्ठ नागरिक संघटनेचे ज्येष्ठ पदाधिकारी अध्यक्ष हणमंत गोळे, सेक्रेटरी कृष्णा पाटील, खजिनदास रामचंद्र डहाणे आदी उपस्थित होते. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनी मोबाईलद्वारे कांबळे यांना शुभेच्छा दिल्या.





**पनवेल : सुकापूरमध्ये पेव्हर ब्लॉकचे काम सुरू आहे. या कामाची पाहणी माजी रायगड जिल्हा परिषद सदस्य तथा अनुसूचित जाती मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अमित जाधव, देवद ग्रामपंचायतीचे सरपंच विनोद वाघमारे, सुकापूर भाजप अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, सरचिटणीस उदय म्हसकर, प्रवीण वाघमारे, कॉन्ट्रॅक्टर निलेश म्हात्रे आदींनी केली.**



**पनवेल : तोंडरे गावातील भाजपचे पनवेल तालुका ग्रामीण युवा मोर्चा चिटणीस रोशन पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, माजी सरपंच राम पाटील, सरपंच अशोक पाटील, धनाजी पाटील, सुभाष पाटील, वतन पाटील, भरत पाटील, विजय पाटील, जगन्नाथ पाटील, अमोल पाटील, नितीन पाटील, प्रवीण पाटील, रोहन पाटील, कौस्तुभ पाटील, कुणाल पाटील, कल्पेश, भामा पाटील, कुशल पाटील, विघ्नेश पाटील, अरुण पाटील, मोहन पाटील, बाळाराम पाटील, अरुण गवळी, किरण पाटील, रोहिदास पाटील, रोहन पाटील आदी उपस्थित होते.**

# उरण पालिका निवडणुकीसाठी भाजपचे अर्ज उद्या होणार दाखल

**उरण : वार्ताहर**

उरण नगर परिषदेच्या निवडणुकीकरिता भाजप नगराध्यक्षपदाचा उमेदवार तसेच नगरसेवकपदाचे उमेदवार यांचा नामांकन दाखल कार्यक्रम गुरुवारी (दि. १३) उरण येथील राघोबादेव मंदिर कोटनाका येथून सुरू होणार आहे.

या वेळी सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञानमंत्री ॲड.आशिष शेलार, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आदी उपस्थित राहणार आहेत.

उमेदवारी अर्ज भरण्यासाठी भाजप उरण तालुका ग्रामीण मंडळ व उरण शहर मंडळ तसेच महायुतीतील सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी व समस्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन भाजप महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य रवी भोईर, उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, उरण शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, उरण ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड यांनी केले आहे.

# हॉकी स्टिकने एकाला मारहाण

**पनवेल : वार्ताहर**

फिर्यादी जुम्मन हनिफ खान यांना काही व्यक्तींनी हॉकी स्टिक व चाकूने मारहाण केल्याची घटना उसर्ली येथे घडली आहे.

फिर्यादी जुम्मन हनिफ खान हे उसर्ली येथे त्यांच्या राहत्या घरी असताना चार व्यक्ती त्यांच्या घरी आले व त्यांनी त्यांच्याशी भांडण काढुन त्यापैकी एकाने हॉकीस्टीक ने फिर्यादी यांच्या डोक्यात मारून व दुसऱ्या एकाने त्याच्याकडे असणाऱ्या चाकुने फिर्यादी यांना डाव्या हाताला मारून दुखापत केली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शिवकर गावामध्ये साकारतोय इको पार्क | भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते प्रकल्पाचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरणाचे संवर्धन आणि नागरिकांना शुद्ध हवेचा अनुभव देण्यासाठी शिवकर ग्रामपंचायतीमध्ये नव्याने इको पार्क विकसित केला जाणार आहे. भारतीय जनता पक्षाचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी (दि.११) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले.



वर्ल्ड व्हिजन इंडिया आणि ह्युंदाई मोबिस च्या सीएसआर फंडातून यामॅग्रोव्ह संवर्धन करणे आणि ऑक्सीपार्क अश्या इको पार्कची उभारणी होणार आहे. हरित उपक्रम या संकल्पनेतून हब पार्क साकारण्यात येणार आहे. शिवकर येथील राजेश जैन हायस्कूलजवळ या पार्कच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

या वेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्यासह भाजप नेते संजय पाटील, एकनाथ देशेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, अमित जाधव, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, यतीन देशमुख, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, उपसरपंच मोनिका पोपेटा, रवींद्र ढवळे, मंगेश ढवळे, संतोष मते, प्रांजल पाटील, रितू पाटील, सुरेखा टिपले, रेश्मा पाटील, ग्रामपंचायत अधिकारी सचिन बाळाराम पाटील, मुख्याध्यापक सुरेश ढवळे, गणपती देवस्थान अध्यक्ष गोपाळ पाटील, चंद्रकांत ढवळे, मोहन पोपटा, तुकाराम टोपले, माया पाटील, तुकाराम पाटील, भरत पाटील, लक्ष्मण कांबळे, रोशन तुपे, समीर पोपेटा, पोलीस पाटील, मिलिंद पोपेटा, गोमा ढवळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

# दहशतवादाचा नवा चेहरा

कारमधील स्फोटाने सोमवारी संध्याकाळी राजधानी दिल्ली हादरण्यापूर्वी दिवसभरात काश्मीर, हरियाणा आणि उत्तर प्रदेश पोलिसांनी केंद्रीय यंत्रणांच्या साह्याने जैश-ए-मोहम्मद आणि अन्सार गझावत-उल-हिंद या दहशतवादी संघटनांशी संबंधित आठ संशयितांना ताब्यात घेतले होते. पोलिसांनी मुझम्मिल अहमद गनी या डॉक्टरला फरिदाबाद येथे अटक करुन २९०० किलो स्फोटकेही जप्त केली होती. त्यातूनच अनेक राज्यांमध्ये पसरलेले डॉक्टरांचे मोठे कनेक्शन आणि दहशतवादाचा एक नवाच चेहरा समोर आला आहे.

**राजधानी नवी दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्थानकानजीक असलेल्या वाहतुकीच्या सिग्नलजवळ सोमवारी सायंकाळी ६ वाजून ५२ मिनिटांनी एका कारमध्ये प्रचंड मोठा स्फोट झाला. या स्फोटाने १२ निरपराध नागरिकांचा बळी घेतला असून वीस जखमींवर उपचार सुरू आहेत. राजधानी दिल्लीमध्ये तब्बल चौदा वर्षांनी झालेल्या या बॉम्बस्फोटामुळे नवी दिल्ली आणि एकंदरच देशातील अन्य महत्त्वाच्या ठिकाणांना असलेला दहशतवादाचा धोका पुन्हा एकदा समोर आला आहे. ज्या भागात हा स्फोट झाला त्या भागात एरव्ही रोज लोकांची प्रचंड गर्दी असते. परंतु सोमवारी लाल किल्ल्यात पर्यटकांना प्रवेश बंद असतो. त्यामुळे आसपासच्या परिसरातील दुकाने व बाजारपेठाही सोमवारी बंद असतात. हाच स्फोट तिथे अन्य कुठल्याही दिवशी झाला असता तर बळींची संख्या याहूनही कितीतरी अधिक असती. झालेल्या स्फोटाची तीव्रता इतकी प्रचंड होती की स्फोट होताच चार मोटारी, दोन ई-रिक्षा आणि एक रिक्षा अशा सात वाहनांनी पेट घेतला. शेकडो मीटर अंतरावरच्या गाड्यांच्या काचा निखळल्या, टायर फुटले, नजीकच्या इमारतींमधील लोकांना हादरा जाणवला. स्फोटात जखमी झालेल्यांच्या शरीरात कोणत्याही प्रकारचे धातूचे तुकडे न सापडल्याने सुरुवातीला स्फोट नेमका कशामुळे झाला असावा हे स्पष्ट झाले नाही. स्फोटाने दिल्ली हादरण्यापूर्वी दिवसभरात पोलिसांनी केंद्रीय यंत्रणांच्या साह्याने दहशतवादी संघटनांशी संबंधित आठ संशयितांना ताब्यात घेतले होते. यात तीन डॉक्टरांचा समावेश होता. त्यात एक महिलाही आहे. स्फोटाच्या फरिदाबाद कनेक्शनचा तपासयंत्रणा शोध घेत आहेत. स्फोटाचा आत्मघाती हल्ला घडवून आणणारा डॉ. उमर मोहम्मद फरिदाबादच्या अल फलाह इस्पितळात कार्यरत होता. फरिदाबादमधील अटकसत्रानंतर आपल्यालाही अटक होणार या विचाराने भयभीत झालेल्या उमरने लाल किल्ल्याजवळ स्फोट घडवला असे म्हटले जाते आहे. नजीकच्या सुनहरी मशीदच्या पार्किंगमध्ये तो दुपारी तीन तास बसून होता असेही समोर आले आहे. तो मूळचा पुलवामाचा असून त्याच्या संपर्कात पुलवामा आणि उत्तर प्रदेशातील अनेक डॉक्टर असल्याचे दिसते. दिल्लीच्या भोवतीने या मंडळींच्या कारवाया ज्या पद्धतीने सुरू होत्या ते उघडकीस आल्याने त्यांच्या संपर्कातील इतरांची पाळेमुळे खणून काढणे आवश्यक बनले आहे. स्फोटामागे कुणाकुणाचा हात होता हे समोर यायलाच हवे आहे. याप्रकरणीचा तपास आता एनआयएकडे दिला गेला आहे. अनेकांची धरपकड करण्यात आली असून चौकशी सुरू आहे. या दुर्घटनेला जबाबदार असलेल्यांपैकी कुणाचीही गय केली जाणार नाही व सर्व संबंधितांच्या मुसक्या आवळल्या जातीलच. स्फोटाच्या पार्श्वभूमीवर आता देशभरातील महत्त्वाची धार्मिक स्थळे व अन्य महत्त्वाच्या ठिकाणांजवळची सुरक्षा व्यवस्था आणखी बळकट करण्यात आली आहे. नागरिकांनीही यानंतर सजग राहण्याची गरज आहे. उच्चशिक्षितही अशातऱ्हेने दहशतवादी विचारसरणीच्या प्रभावाखाली येऊन निरपराधांचा बळी घेऊ शकतात हा धोक्याचा मोठा इशारा या दहशतवादी स्फोटाने दिला आहे.**

# कोकण रेल्वेचे शिल्पकार प्रा. मधु दंडवते



मधु दंडवते! हे भारतीय राजकारणाच्या इतिहासातलं एक महत्त्वाचं आणि मोठं नाव आहे. कोकण रेल्वेचे शिल्पकार म्हणून ज्यांच्याकडे पाहिलं जातं, त्या मधू दंडवते यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यात २१ जानेवारी १९२४ रोजी झाला. घरातूनच साहित्यिक वारसा दंडवतेंना लाभला होता.अहमदनगरच्या नगरपालिकेच्या शाळेत माध्यमिक शिक्षणानंतर मॅट्रिकच्या शिक्षणासाठी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत दाखल झाले.

कविता, नाटक यांसह क्रिकेटची आवड मधु दंडवतेंना शालेय जीवनापासूनच होती. 'जीवनाशी संवाद' या आपल्या आत्मचरित्रात मधु दंडवते सांगतात, शालेय जीवनातच मला क्रिकेटचीही गोडी लागली. त्यात मी काही पारितोषिकेही मिळवली. माझ्या वडिलांनाही क्रिकेटची गोडी असल्यामुळे त्यांनी माझ्या क्रिकेटशौकास उत्तेजनच दिले. माझी क्रिकेटची आवड आणि खेळातील कौशल्य विकसित व्हावे, म्हणून पुढील शिक्षणासाठी मी मुंबईला जावे, असे माझ्या वडिलांचे मत पडले. क्रिकेटमधील आवड आणि वडिलांनी दिलेलं प्रोत्सहन, यांमुळे मधु दंडवते मुंबईत क्रिकेटमध्ये करिअर करण्यासाठी आले. अर्थात, शिक्षणाकडे त्यांना दुर्लक्ष करायचं नव्हतचं. भौतिकशास्त्र हा त्यांचा आवडता विषय होता.

मुंबईत आल्यानंतर रामनारायण रुईया कॉलेजमध्ये विज्ञानशाखेमध्ये प्रवेश घेतला. तिथे दोन वर्षे शिक्षण घेतल्यानंतर मुंबईतील रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या प्रतिष्ठित विज्ञानससंस्थेतून भौतिकशास्त्रात (फिजिक्स) एम. एस्सी पदवी मिळवली. मुंबई विद्यापीठ आणि सिद्धार्थ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्समध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिक्षक म्हणून पुढे दंडवते नियुक्त झाले.

जनता दलाचे आघाडीचे नेते असलेल्या मधू दंडवते यांचा राजकारणात येण्याचा प्रवास, त्याचे राजकीय निर्णय आणि राजकीय किस्से हे आजही यादगार आहेत. रेल्वेमंत्री ते अर्थमंत्री, अशा दोन्ही महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या मधू दंडवते यांच्याकडे एक प्रेरणादायी नेतृत्व म्हणून पाहिलं जातं. मूळचे पश्चिम महाराष्ट्रातल्या अहमदगरचे असलेले मधू दंडवते हे आजही कोकणातल्या गावागावात, घराघरात चर्चिले जातात. आधी प्राध्यापक असणाऱ्या मधु दंडवते यांनी आपल्या कार्यकाळात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतलेत. क्रिकेटर बनण्यासाठी मधु दंडवते यांच्या वडिलांनी त्यांना मुंबईत पाठवलं खरं. तर अभ्यासही हुशार असणाऱ्या मधु दंडवते यांनी क्रिकेटसोबत राजकारणही जोरदार फटकेबाजी करत आपल्या टायमिंगची चुणूक विरोधकांना दाखवून दिली होती.

सामाजिक कार्यकर्ते मंजू मोहन यांनी दिलेल्या माहितीनुसार, जेव्हा मंत्रिपदासाठी इतर मंत्री लॉबिंग करत होते, तेव्हा मधु दंडवते हे कपडे धुण्यात व्यस्त होते. दंडवते तेव्हा व्हीपी हाऊसच्या ४०३ नंबर रुममध्ये राहत होते. एक दिवस त्यांच्या घरी एक आईएस अधिकारी आणि नेते दाखल झाले. एक बातमी घेऊन अधिकारी आणि नेते मंडळी मधु दंडवते यांच्या रुमवर पोहोचले होते. दरवाजा उघडणाऱ्या कार्यकर्त्याला अधिकारी आणि नेते मंडळींनी मधु दंडवते कुठे आहेत, अशी विचारणा केली. तेव्हा कार्यकर्त्यानं मधु दंडवते हे तर बाथरुममध्ये आहेत. बाथरुमच्या दिशेनं पाहिलं तर बाथरुमचा दरवाजा उघडाच होता आणि दरवाजातून कपडे धुण्याचा आवाज येत होते. मधु दंडवते आपले कुर्ते हातानं धुवत होते. कुणीतरी आल्याचं ऐकून, अर्धओल्या कपड्यातच ते बाहेर आले आणि सांगू लागले, निवडणुकीच्या धामधुमीत सगळेच कपडे खराब झाले होते. धुवायला वेळच मिळाला नव्हता. म्हणून आता कपडे धुवायाला बसलोय.

त्यावेळी कपडे धुवत असलेल्या मधु दंडवते यांना कुठे माहीत होतं की थोड्या वेळानं आपल्याला मंत्रिपदाची शपथ घ्यायची आहे? ते आपल्याच कामाच्या विचारात होते. बाथरुममधून बाहेर आलेल्या मधु दंडवतें कपडे धूत आहेत हे कळल्यानंतर अधिकारी आणि नेते मंडळीही चकीतच झाली होती. संधी मिळाली म्हणून कपडे धुवायला बसलेल्या मधु दंडवते यांना उद्देशून मंत्रिपदाचं आमंत्रण घेऊन आलेल्या मंडळींनी त्यांना अखेर गूडन्यूज दिली. संधी मिळाली आहे, पण कपडे धुण्याची नाही, तर मंत्रिपदाची शपथ घेण्याची, असं म्हणत त्यांच्यापर्यंत कपडे धुण्याचं काम थांबवून सरकारच्या शपथविधी सोहळ्याला हजर राहायचं आहे, असं सांगितलं. मोरारई देसाई यांच्या मंत्रिमंडळात मधु दंडवते रेल्वे मंत्री बनले. त्यानंतर त्यांनी कोकण रेल्वेच्या कामाचं स्वप्न नुसतं पाहिलं नाही, तर सत्यातही उतरवलं. तोच रेल्वेमंत्री ज्यानं रेल्वेडब्यात लाकडावर गादी बसवली

मधु दंडवते रेल्वेमंत्री झाल्यानंतर त्यांनी अनेक धडाडीचे निर्णय घेतले. रेल्वेच्या तिकिटासाठी कुणी आपला वशिला लावत असेल, ओळख सांगत असेल, तर आपलं अशा माणसांची मागणी सगळ्यात आधी फेटाळा, असा निर्णयही त्यांनी आपल्या सगळ्या टीमला जारी केला होता. इतकंच काय तर मधु दंडवते हे त्यांच्या एका ऐतिहासिक निर्णयासाठीही ओळखले जातात. त्या काळात रेल्वेल सेकंड स्लिपर क्लासमध्येही लाकडाचीच बाकडी असायची. या बाकड्यांवर गादी बसवण्याचा निर्णय प्रोफेसर असलेल्या मधु दंडवते यांनी घेतला. १२ नोव्हेंबर २००५ साली त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले नव्हते. मधु दंडवते यांनी दहनाऐवजी आपला देहदान करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार त्यांचा देह हा मुंबईतील जे जे रुग्णालयत दान करण्यात आला होता. मधू दंडवते यांचं निधन झालं, तेव्हा संपूर्ण महाराष्ट्रा हळहळला होता, पण सर्वात जास्त दुःख हे कोकणाला झालं होतं. कोकणातल्या लोकांचा अशक्यप्राय समजला जाणारा कोकण रेल्वेचा प्रवास मधु दंडवते यांच्या दूरदृष्टीनं शक्य करुन दाखवला होता. (साभार : इंटरनेट)

# बहाई पंथाचे संस्थापक बहाउल्ला

बहाअल्लाह ही इराणमधील मिर्झा हुसेन अली नूरी यांनी धारण केलेली एक उपाधी होय. 'वहा' या फार्सी शब्दाचा अर्थ प्रकाश, तेज वा ऐश्वर्य असा आहे. म्हणून 'बहाउल्ला' म्हणजे 'ईश्र्वरी तेज' असा अर्थ होतो. त्यांनी आपण ईश्वरी आविष्कार आहोत अशी घोषणा केलेली असल्यामुळे 'बहाउल्ला' ही उपाधी धारण केली.

इराणच्या एका खानदानी कुटुंबात त्यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८१७ रोजी झाला. त्यांचे वडील इराणी शहाच्या मंत्रिमंडळात होते. बहाउल्ला यांना मात्र राजकीय महत्त्वाकांक्षा नव्हती. ते लहानपणापासूनच धार्मिक होते आणि दैवी चमत्कार करून लोकांना प्रभावित करीत होते. ते कधीही शाळेत गेले नव्हते. १८४७ च्या सुमारास त्यांनी बाबचे शिष्यत्व पतकरले. बाब व बहाउल्ला यांची प्रत्यक्ष भेट मात्र झाली नव्हती. पुढे बाबच्या हत्येनंतर त्यांच्या दोन अनुयायांनी इराणच्या शहाचा वध करण्याच्या अयशस्वी प्रयत्न केला. बहाउल्लांना या कटाची माहिती नव्हती, तरीही त्यांना अटक करण्यात आली, त्यांचा छळ करण्यात आला. याच काळात त्यांना काही दृष्टांत झाले आणि आपल्या हातून ईश्वरी कार्य होणार असल्याची जाणीव त्यांना झाली. सुटकेनंतर ते बगदादला (इराक) आले. बाबने आपला आध्यात्मिक वारस म्हणून बहाउल्लांचा सावत्र भाऊ मिर्झा यह्या ऊर्फ सुबह-इ-अझल याची नेमणूक केली होती परंतु तो वयाने लहान व एकांतप्रिय असल्यामुळे बाबी पंथाच्या नेतृत्वाची जबाबदारी अप्रत्यक्ष रीत्या बहाउल्लांवरच येऊन पडली. बगदादला आल्यावर त्यांनी दोन वर्षे (१९५४ – ५६) कुर्दिस्तानमध्ये एकांतात व्यतीत केली. हा त्यांच्या आध्यात्मिक तयारीचा काळ मानला जातो. त्यानंतर बगदादमध्ये त्यांचा प्रभाव वाढू लागला. त्यामुळे त्यांना त्यांच्या अनुयायांसह तेथूनही हद्दपार करावे, असे इराणी सरकारने तुर्की सरकारला सुचविले.

बाबने ज्याच्या आगमनाची पूर्वसूचना दिली होती, तो ईश्वरी आविष्कार मीच होय, असे तेथे त्यांनी आपल्या काही अनुयायांपुढे घोषित केले (२१ एप्रिल १८६३). एड्रिॲनोपल येथे त्यांनी आपण ईश्वरी आविष्कार असल्याचे जाहीर रीत्या घोषित केले (१८६७) आणि तशा अर्थाची पत्रे त्यांनी पोप व इस्लामी धर्मगुरू यांना लिहिली. तसेच इराण, रशिया, ब्रिटन, ऑस्ट्रिया इ. राष्ट्रांच्या प्रमुखांनाही त्यांनी पत्रे लिहिली आणि आपल्या कार्यास पाठिंबा देण्याची विनंती केली. यानंतर बहुसंख्य 'बाबीं' नी बहाउल्लांचे अनुयायित्व स्वीकराले. ते अनुयायी आता स्वतः ला 'बाबी' म्हणून घेण्याऐवजी 'बहाई' म्हणवू लागले. बहाउल्लांनी स्वतःच्या धर्मविषयक स्वतंत्र कल्पना मांडण्यास सुरूवात केली. अशा रीतीने बाबी पंथातूनच बहाई धर्माचा उदय झाला.

यदुही लोकांकरिता सनातन पिता, मुसलमानांकरिता पुन्हा प्रकट झालेला इमाम आणि ख्रिस्ती लोकांकरिता पुनरागत ख्रिस्त आहे. (साभार : इंटरनेट)




# ड्रायव्हिंग लायसन्ससाठी 'हे' ॲप्स इन्स्टॉल करा

ट्रॅफिक टाळण्यासाठी सरकारने सर्वसामान्यांना डिजिलॉकर ॲपची सुविधा दिली आहे. म्हणजे आजच्या काळात कार किंवा बाईकची फिजिकल डॉक्युमेंट्स सोबत बाळगण्याची गरज नाही. वाहन मालक डिजिलॉकर ॲपच्या मदतीने कागदपत्रे दाखवू शकतो, जो पूर्णपणे वैध असेल.



आता वाहतूक पोलिस त्यांच्या मोबाईलमधून क्यूआर कोड स्कॅन करून ड्रायव्हर आणि वाहनाशी संबंधित सर्व आवश्यक माहिती मिळवू शकतात तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याची नोंदही डिजिटल पद्धतीने ठेवता येणार आहे.


पूर्वी जिथे चालान लगेच कळायचे, आता अनेकदा फोनवर मेसेज आल्यावरच कळते की तुमचे चालान कापले गेले आहे. तसेच चालानच्या रकमेतही पूर्वीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली आहे. अनेकदा आवश्यक कागदपत्रांअभावी आपण चालान टाळू शकत नाही. पण तुम्हाला माहित आहे का की, केवळ मोबाईल ॲपच्या मदतीने तुम्ही ही समस्या टाळू शकता.

आयटी ॲक्टनुसार ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी प्रमाणपत्र, विमा अशा कागदपत्रांच्या प्रत्यक्ष प्रती दाखवणे बंधनकारक नाही. डिजिलॉकर आणि एमपरिवहन ॲपवर उपलब्ध कागदपत्रांची डिजिटल प्रत वैध मानली जाईल, असे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. आता वाहतूक पोलीस त्यांच्या मोबाईलमधून क्यूआर कोड स्कॅन करून ड्रायव्हर आणि वाहनाशी संबंधित सर्व आवश्यक माहिती मिळवू शकतात तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याची नोंदही डिजिटल पद्धतीने ठेवता येणार आहे.

या फीचरचा लाभ घेण्यासाठी सर्वप्रथम तुम्ही तुमच्या स्मार्टफोनमध्ये डिजिलॉकर आणि एमपरिवहन ॲप डाऊनलोड करावे. ॲपमध्ये नोंदणी करण्यासाठी आपला मोबाइल नंबर प्रविष्ट करा आणि ओटीपी पडताळणी प्रक्रिया पूर्ण करा. त्यानंतर तुमचे युजरनेम आणि पासवर्ड सेट करून ॲपमध्ये लॉग इन करा.

आता तुम्हाला तुमचा आधार क्रमांक डिजिलॉकर ॲपमध्ये लिंक करावा लागेल आणि ओटीपीद्वारे त्याची पडताळणी करावी लागेल. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तुम्ही तुमचा ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी प्रमाणपत्र (आरसी) आणि विम्याची डिजिटल प्रत डिजिलॉकरवरून डाऊनलोड करू शकाल.

# सशस्त्र क्रांतिकारक सेनापती बापट



### निमित्त

सेनापती बापट सशस्त्र क्रांतिकारक, तत्त्वचिंतक व लढाऊ समाजसेवक. पूर्ण नाव पांडुरंग महादेव बापट. १९२१ ते १९२४ या कालखंडात पुणे जिल्ह्यातील मुळशी पेट्यात धरणग्रस्त गावांकरिता व शेतकऱ्यांकरिता बापट यांनी सत्याग्रहाचा लढा दिला. त्यामध्ये महाराष्ट्रातील जे शेकडो सत्याग्रही सामील झाले त्यांचे त्यांनी नेतृत्व केले. त्यामुळे 'सेनापती बापट' या शब्दावलीने ते ओळखले जाऊ लागले. सेनापती बापट यांचा आज स्मृतीदिन आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर येथे गरीब कुटुंबात जन्म झाला. आईचे नाव गंगाबाई. माध्यमिक आणि बी.ए. पर्यंतचे उच्च शिक्षण मुख्यत्वे करून पुणे येथे झाले. डेक्कन कॉलेजमध्ये सशस्त्र क्रांतीच्या द्वारे भारत स्वतंत्र करण्याची शपथ तलवारीवर हात ठेवून घेतली. बी.ए. परीक्षेत १९३ साली उत्तीर्ण झाल्यावर मुंबई विद्यापीठाचे शिष्यवृत्ती मिळवून ते इंग्लंडला गेले. एडिंबरो येथे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतानाच क्रांतिकारक विचारांचा प्रचार करीत असल्यामुळे शिष्यवृत्ती बदं होऊन शिक्षण अपुरे राहिले.

श्यामजी कृष्ण वर्मा या क्रांतिकारक नेत्याशी परिचय होऊन त्यांच्या मदतीने पॅरिस येथे राहून तेथील रशियन क्रांतिकारकांकडून प्रचंड स्फोटक बाँबची तंत्रविद्या हस्तगत केली. त्या तंत्रविद्येची पुस्तिका भारतात व बंगालमधील क्रांतिकारक गटांपर्यंत पोहोचविली. क्रांतिकारकांच्या कटाच्या एका खटल्यात माफीच्या साक्षीदाराने बापटांचे नाव उघडकीस आणल्यामुळे बापट हे १९८ ते १९१२ पर्यंत चार वर्षे अज्ञातवासात राहिले. नंतर १९२१ पर्यंत स्वत:च्या जन्मगावी शिक्षक म्हणून राहिले आणि समाजसेवेचे व्रत घेतले. पहाटे उठल्याबरोबर गावचे रस्ते झाडणे व शौचकूप साफ करणे हे व्रत त्यांनी जन्मभर स्वीकारले. १९२१ ते १९२४ या कालखंडात पुणे जिल्ह्यातील मुळशी पेटा येथील धरणग्रस्त शेतकऱ्यांना जमीन मिळविण्याकरिता सत्याग्रहाचे आंदोलन चालविले. या आंदोलनात कारागृहवासाची तीनदा शिक्षा त्यांना झाली. शेवटची सात वर्षे सक्तमजुरीची होती. राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनामध्ये भाग घेत असताना राजद्रोहात्मक भाषणे केल्याबद्दल अनेकदा अनेक वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली.

संस्थांनी प्रजांच्या हक्कांकरिता चालू असलेल्या आंदोलनात भाग घेऊन संस्थानाच्या प्रवेशबंद्या त्यांनी मोडल्या; त्याबद्दल कारागृहवासही सोसला. स्वातंत्र्योत्तरकाळातही भाववाढ विरोधी आंदोलन, गोवामुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन इ. आंदोलनांमध्ये त्यांनी पुढाकार घेतला. आंदोलन करीत असताना कारागृहात आंदोलनाला पूरक अशा तऱ्हेचे साहित्य लिहिले व ते प्रकाशित केले. त्यांनी अपुरे राहिलेले छोटेसे आत्मचरित्र लिहिले आहे. बरेचसे लेखन मराठीत व थोडे इंग्रजीत व संस्कृतमध्ये केले; लेखनाला पद्याकार दिला. क्रांतिवादी राजकारणाचे समर्थन करणारे, भगवतगीतेच्या तत्त्वज्ञानावर आधारलेले, राष्ट्रमुक्ती व अन्याय प्रतिकार या दोन मुद्यांना अनुसरून युक्तिवाद केलेले हे साहित्य आहे. चैतन्यगाथा हे पुस्तक वाचले म्हणजे त्यांचे मूलभूत विचार लक्षात येतात. मराठीमध्ये योगी अरविंदांच्या इंग्लिशमधील आध्यात्मिक तत्त्वज्ञानावरील ग्रंथांचा उत्कृष्ट अनुवाद बापटांनी केला आहे. अरविंदांचा दिव्यजीवन हा मोठा ग्रंथ बापटांनी प्रसन्न शैलीने मराठीत उतरविला आहे. त्यांचे साहित्य समग्र ग्रंथ (१९७७) म्हणून साहित्य व संस्कृती मंडळाच्या अनुदानाने प्रसिद्ध झाले आहे. (साभार : विकासपीडिया)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# एनर्जी ड्रिंक घेताना सावधान! आजार वाढू शकतात...

प्रसिद्ध अमेरिकन फास्ट-फूड कंपनीच्या चार्ज्ड लेमनेड (लिंबू सरबत)मुळे २१ वर्षीय विद्यार्थिनी सारा कॅट्झचा मृत्यू झाल्याचे प्रकरण सध्या चर्चेत आहे. या विद्यार्थिनीला लाँग क्यूटी टाइप १ सिंड्रोम होता. ही अशी एक स्थिती आहे, ज्यामध्ये हृदयाची विद्युत लय प्रभावित होऊन जीवघेणी परिस्थिती ओढवू शकते. अहवालांनुसार मृत तरुणीने कॅफिनयुक्त पेये टाळून ही स्थिती नियंत्रणात आणली होती, मात्र घटनेच्या दिवशी तिने ३९० एमजी कॅफिन असलेले अधिक कॅफिनेटेड एनर्जी ड्रिंक प्यायले होते. हे एक पेय कॉफीच्या चार कपांच्या बरोबरीचे होते आणि त्यादिवशी नंतर तिचे निधन झाले.



या घटनेने पुन्हा एकदा एनर्जी ड्रिंक्सच्या अतिसेवनाचे विशेषत: १८ वर्षाखालील तरुणांमधील दुष्परिणाम सर्वांसमोर आणले आहेत. जागतिक स्तरावरील अभ्यासांमध्ये असे दिसून आले आहे की, काही तरुण ग्राहकांमध्ये कॅफीन ॲलर्जीचा धोका दिसून आला आहे, ज्यामुळे शारीरिक बदल दिसून येऊ लागतात. जास्त प्रमाणात कॅफीन सेवन केल्याने टाकीकार्डिया होऊ शकतो, म्हणजे काय तर, तरुणांमध्ये अचानक हृदयाची धडधड अधिक गतीने होणे, मळमळ, उलट्या, डोकेदुखी अशी लक्षणे दिसून येतात. यामुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी कार्यात अडथळे येऊ शकतात. यात अगोदरच जर तुम्हाला कॅफिनची ॲलर्जी किंवा अन्य काही आजार असतील तर जोखीम आणखी वाढू शकते. एनर्जी ड्रिंकचा उत्तेजक प्रभाव झोपेमध्येसुद्धा व्यत्यय आणू शकतो परिणामी तुम्ही निद्रानाशसुद्धा अनुभवू शकता. पुरेशी झोप न झाल्याने नेहमीची कामे करण्यातसुद्धा अडथळा येऊ शकतो, मूड खराब होऊ शकतो.

क्लिनिकल आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून सतत एनर्जी ड्रिंकच्या सेवनामुळे लठ्ठपणा आणि दाताच्या समस्यांबद्दल चिंता निर्माण होते. अधिक साखर ही कॅलरी सेवन वाढण्यास कारणीभूत ठरते, ज्यामुळे कालांतराने वजन वाढण्याची शक्यता असते. अतिवजन हे परिणामी हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगांसाठीसुद्धा जोखीम घटक सिद्ध होऊ शकते. याव्यतिरिक्त एनर्जी ड्रिंक्समधील साखर आणि आंबटपणामुळे दातांना धोका निर्माण होतो, ज्यामुळे पोकळी तयार होते तसेच दातांना सुरक्षित ठेवणारा दातांवरील थरसुद्धा नष्ट होऊ लागतो. तरुण वयात जेव्हा मज्जासंस्था अजूनही विकसित होत असतात तेव्हा उत्तेजक पेयांमुळे व्यवसानाधीनतेकडे वळण्याची गती अधिक वाढू शकते.

# PUBLIC NOTICE

This is to notify that Integrated Regional Office, Ministry of Environment, Forest & Climate Change (Forest Conservation Division), Government of India, Delhi, Letter 8-34/2022-FC I/78766/2024, Dated 02/08/2024 and 8-34/2022-FC I/113894/2025 Dated- 03/06/2025 accorded respectively In-principle (i.e. Stage-I) and Final (i.e. Stage-II) approvals for Diversion 263.5406 Ha. Acquired Forest Land for Sambarkund Medium Irrigation Project construction of Earthen Dam, Waste Weir, Tail Channel, PDN (Pipe Distribution Network), Approach Road and Rehabilitation for agriculture land, increase in GDP of the area leading to elevating Socio-Economic Status of Cultivators, Benefit to 33 villages of Alibag Taluka. Assured Drinking Water supply to nearby villages and Alibag Taluka, District Raigad in the State of Maharashtra in favour of Executive Engineer, Hetawane Medium Project Division Kamarli Tal. Pen Dist. Raigad. Further, Government of Maharashtra (Revenue and Forest Department) vide Government Order No.FLD-2022/C.R.294/F-10, Dated 06/11/2025 granted permission for Diversion of 263.5406 Ha. Acquired Forest land for construction of Sambarkund Medium Irrigation Project construction of Earthen Dam, Waste Weir, Tail Channel, PDN (Pipe Distribution Network), Approach Road and Rehabilitation work Village-Mahan, Taluka- Alibag, District- Raigad in the State of Maharashtra in favour of Executive Engineer, Hetawane Medium Project Division Kamarli Tal. Pen Dist. Raigad. This permission is granted subject fulfilment of the following terms/ conditions-

**As per the above GOI Letter dated 02/08/2024 & dated 03/06/2025**

**1. In-Principle/Stage-1 (02.08.2024) Condition**

i. Legal status of the diverted forest land shall remain unchanged

ii. The user agency shall furnish a report from the State Dam Safety Organization (SDSO) regarding all technical aspects wrt the of the dam. The recommendations shall be implemented by the user agency to avoid any possible unforeseen conditions.

iii. Further, the State Government shall obtain approval of the National Dam Safety Authority (NDSA) on the recommendations made by the State Dam Safety Organization (SDSO) and submit the same before Stage II approval along with the compliance of Stage I approval conditions.

iv. The User Agency shall transfer the cost of raising and maintaining the compensatory afforestation at the prevailing wage rates as per compensatory afforstation scheme and the cost of survey, demarcation and erection of permanent pillars if required on the CA land shall be deposited in consultation with State Forest Department in the account of CAMPA of the concerned State through online portal. The CA will be maintained for 10 years. The scheme may include appropriate provision for anticipated cost increase for works scheduled for subsequent years.

v. The User Agency shall transfer the funds towards the cost of Net Present Value (NPV) of the forest land being diverted under this proposal in accordance with the guidelines in the matter.

vi. At the time of payment of the Net Present Value (NPV) at the present rate, the user agency shall furnish an undertaking to pay the additional amount of NPV, if so determined, as per the final decision of the Hon'ble Supreme Court of India.

vii. The non-forest land identified for Compensatory Afforestation shall be transferred and mutated in favour of the State Forest Department and notified by the State Government as Protected Forests under section 29 of the Indian Forest Act, 1927 or under the relevant section(s) of the local Forest Act, before issue of the 'Final' approval under the Adhiniyam. The Nodal Officer shall report compliance in this regard along with a copy of the original notification declaring the non-forest land as PF, along with compliance of 'in principle' approval.

viii. The copy of approved Catchment Area Treatment (CAT) Plan shall be submitted and the commensurate cost of CAT plan shall be deposited in the CAMPA account through online portal.

ix. The mirtimum water flow will be maintained in the downstream of river as per the conditions stipulated in the approval accorded by the Water Resource Department, Government of Maharashtra The user agency shall carry out muck disposal at pré-designated sites in such a manner so as to avoid its rolling down.

xi. The dumping area for muck disposal shall be stabilized and reclaimed by planting suitable species by the user agency at the cost of project under the supervision of State Forest Department. Retaining walls and terracing shall be carried out to hold the dumping material in place.

xii. The user agency shall provide free water for the forestry related projects.

xiii. The cost of felling of trees shall be deposited by the User Agency with the State Forest Department.

xiv. The State Government shall upload the KML files of the area under diversion and the accepted area for raising compensatory afforestation in the E-green watch portal of FSI, before handing over forest land to the user agency;

xv. All the funds received from the user agency under the project shall be transferred / deposited in CAMPA account only through e-portal (https://parivesh.nic.in/). Amount deposited through other mode will not be accepted as compliance of the Stage-1 clearance.

xvi. Forest land will be handed over only after required non-forest land in the project is obtained by the user agency.

xvii. The felling of trees shall be restricted to FRL-4 meter only. Number of trees to be removed shall be kept at barest minimum during the execution of the project.

xviii. The User Agency shall restrict the felling of trees to minimum numbers in the diverted forest land and trees shall be felled under strict supervision of the State Forest Department.

xix. The user agency shall explore the possibility of translocation of maximum number of trees identified to be felled and shall ensure that any tree felling shall be done only when it is unavoidable and that too under strict supervision of the State Forest Department.

xx. The R&R Plan shall be implemented as per the R&R Policy of State Government in consonance with National R&R Policy, Government of India before the commencement of the project work and implementation. The said R&R Plan will be monitored by the State Government/ Regional Office of MoEF & CC along with indicators for monitoring and expected observable milestones.

xxi. The User Agency shall obtain the Environment Clearance as per the provisions of the Environmental (Protection) Act, 1986, if required.

xxii. The User Agency shall undertake afforestation along the periphery of the reservoir.

xxiii. No labour camp shall be established on the forest land and the User Agency shall provide fuels preferably alternate fuels to the labourers and the staff working at the site so as to avoid any damage and pressure on the nearby forest areas.

xxiv. The boundary of the diverted forest land, shall be demarcated on ground at the project cost, by erecting four feet high reinforced cement concrete pillars, each inscribed with its serial number, distance from pillar to pillar and GPS coordinates.

xxv. The forest land proposed to be diverted shall under no circumstances be transferred to any other agency, department or person without prior approval of the Central Governmerft;

xxvi. No damage to the flora and fauna of the adjoining area shall be caused;

xxvii. The layout plan of the proposal shall not be changed without the prior approval of the Central Government;

xxviii. No additional or new path will be constructed inside the forest area for the execution of this project.

xxix. The period of diversion under this approval shall be co-terminus with the period of lease to be granted in favour of the user agency or the project life, whichever is less.

xxx. The user agency in consultation with the State Government shall create and maintain alternate habitat/home for the avifauna, whose nesting trees are to be cleared in this project. Bird's nests artificially made out of eco-friendly material shall be used in the area, including forest area and human settlements, adjoining the forest area being diverted for the project.

xxxi. The concerned Divisional Forest Officer, will monitor and take necessary mitigative measures to ensure that there is no adverse impact on the forests in the surrounding area.

xxxii. The User Agency shall submit the annual self-compliance report in respect of the above stated conditions to the State Government, concerned Regional Office and to this Ministry by the end of March every year regularly.

xxxiii. The user agency shall comply all the provisions of the all Acts, Rules, Regulations, Guidelines, Hon'ble Court Order (s) and NGT Order (s) pertaining to this project, if any, for the time being in force, as applicable to the project.

xxxiv. Any other condition that the Ministry of Environment, Forests & Climate Change may stipulate from time to time in the interest of conservation, protection and development of forests & wildlife.

xxxv. Violation of any of these conditions will amount to violation of Van (Sanrakshan Evam Samvardhan) Adhiniyam, 1980 and action would be taken as prescribed in para 1.16 of consolidated guidelines and clarifications issued under Van (Sanrakshan Evam Samvardhan) Adhiniyam, 1980 as issued by this Ministry on dated 29.12.2023.

xxxvi. The compliance report shall be uploaded on e-portal (https://parivesh.nic.in/).

**2. Final Approval (03.06.2025) Condition**

i. Legal status of the diverted forest land will remain unchanged;

ii. The State Govt. shall ensure that the recommendations of the State Dam Safety Organisation (SDSO) and as concurred by the National Dam Safety Authority (NDSA) will be implemented by the user agency to avoid any possible unforeseen conditions;

iii. The Compensatory Afforestation shall be raised on identified non-forest land and the work for compensatory afforestation shall start within a period of two years from the date of issue of Final approval and maintained thereafter in accordance with the approved scheme at the cost of the user agency,

iv. The non-forest land transferred and mutated in favour of the State Forest Department or the revenue forest land, as the case may be, shall be notified by the State Government under the Indian Forest Act, 1927 or under the relevant section(s) of the local Forest Act, before handing over the forest land to the user agency;

v. The State Government has realized the NPV of the forest area diverted under this proposal from the User Agency, as per the orders dated 28.03.2008, 24.04.2008 and 09.05.2008 passed by the Hon'ble Supreme Court of India in Writ Petition (Civil) No. 202/| 1995 and the guidelines given under para 3 of the Chapter 3 of the Consolidate Guidelines and Clarifications issued under the Van (Sanrakshan Evam Samvardhan) Adhiniyam, 1980 and Van (Sanrakshan Evam Samvardhan) Rules, 2023 published by the Ministry on 29.12.2023, the user agency shall pay the additional amount of NPV, if so determined, as per the final decision of the Hon'ble Supreme Court of India;

vi. The approved Catchment Area Treatment (CAT) Plan shall be implemented at the cost of user agency;

vii. The State Govt. shall ensure that the minimum water flow will be maintained in the downstream of river as per the conditions stipulated in the approval accorded by the Water Resource Department, Government of Maharashtra;

viii. The State Govt. shall ensure that the user agency shall carry out muck disposal at pre-designated sites in such a manner so as to avoid its rolling down;

ix. The State Govt. shall ensure that the dumping area for muck disposal shall be stabilized and reclaimed by planting suitable species by the user agency at the cost of project under the supervision of State Forest Department. 8-34/2022-FC I/113894/2025 Retaining walls and terracing shall be carried out to hold the dumping material in place:

x. The State Govt. shall ensure that the user agency shall provide free water for the forestry related projects;

xi. The State Govt. shall ensure that the forest land will be handed over only after required non-forest land in the project is obtained by the user agency;

xii. The State Govt. shall ensure that the felling of trees shall be restricted to FRL-4 meter only. Number of trees to be removed shall be kept at barest minimum during the execution of the project;

xiii. The State Govt. shall ensure that the User Agency shall restrict the felling of trees to minimum numbers in the diverted forest land and trees shall be felled under strict supervision of the State Forest Department,

xiv. The user agency shall explore the possibility of translocation of maximum number of trees identified to be felled and shall ensure that any tree felling shall be done only when it is unavoidable and that too under strict supervision of the State Forest Department;

xv. The R&R Plan shall be implemented as per the R&R Policy of State Government in consonance with National R&R Policy, Government of India before the commencement of the project work and implementation. The said R&R Plan will be monitored by the State Government/ Regional Office of MoEF & CC along with indicators for monitoring and expected observable milestones;

xvi. The User Agency shall obtain the Environment Clearance as per the provisions of the Environmental (Protection) Act, 1986, if required;

xvii. The User Agency shall undertake afforestation along the periphery of the reservoir;

xviii. No labour camp shall be established on the forest land and the User Agency shall provide fuels preferably alternate fuels to the labourers and the staff working at the site so as to avoid any damage and pressure on the nearby forest areas;

xix. The boundary of the diverted forest larld, shall be demarcated on ground at the project cost, by erecting four feet high reinforced cement concrete pillars, each inscribed with its serial number, distance from pillar to pillar and GPS coordinates;

xx. The forest land proposed to be diverted shall under no circumstances be transferred to any other agency, department or person without prior approval of the Central Government;

xxi. No damage to the flora and fauna of the adjoining area shall be caused;

xxii. The layout plan of the proposal shall not be changed without the prior 8-34/2022-FC I/113894/2025 approval of the Central Government;

xxiii. No additional or new path will be constructed inside the forest area for the execution of this project;

xxiv. The period of diversion under this approval shall be co-terminus with the period of lease to be granted in favour of the user agency or the project life, whichever is less;

xxv. The user agency in consultation with the State Government shall create and maintain alternate habitat/home for the avifauna, whose nesting trees are to be cleared in this project. Bird's nests artificially made out of eco-friendly material shall be used in the area, including forest area and human settlements, adjoining the forest area being diverted for the project;

xxvi. The concerned Divisional Forest Officer, will monitor and take necessary mitigative measures to ensure that there is no adverse impact on the forests in the surrounding area;

xxvii. The User Agency shall submit the annual self-compliance report in respect of the above stated conditions to the State Government, concerned Regional Office and to this Ministry by the end of March every year regularly

xxviii. The user agency shall comply all the provisions of the all Acts, Rules, Regulations, Guidelines, Hon'ble Court Order (s) and NGT Order (s) pertaining to this project, if any, for the time being in force, as applicable to the project;

xxix. Any other condition that the Ministry of Environment, Forests & Climate Change may stipulate from time to time in the interest of conservation, protection and development of forests & wildlife;

( पान ७ वर )

# पेज नदीवरील पूल धोकादायक

## भालीवाडीत अपघातांना निमंत्रण, डागडुजीची मागणी

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्गावर भालिवाडी येथील पेज नदीवरील पूल सध्या गंभीर अवस्थेत असून अपघातांना आमंत्रण देत आहे. या पुलावर मोठमोठे खड्डे पडले असून ते वाहनचालकांसाठी जीवघेणे ठरत आहेत. प्रशासनाचे दुर्लक्ष आणि देखभाल नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.



कर्जत तालुक्यातील रस्त्यांची दुरवस्था आहे. ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते म्हणजे डोक्याला ताप, परंतु आता कर्जत-मुरबाड हा राष्ट्रीय महामार्गदेखील चर्चेत आला. दररोज या मार्गावरून मोठ्या प्रमाणावर हलकी तसेच जड वाहने धावत असतात, मात्र भालिवडी येथील पेज नदीवरील पुलाची दुरवस्था इतकी गंभीर झाली आहे की, वाहनचालकांना जीव मुठीत धरूनच प्रवास करावा लागत आहे. काही दिवसांपूर्वी याच पुलावर मोटरसायकल चालकाचा अपघात झाला होता, ज्यात तो गंभीर जखमी झाला होता. त्यातच आता येथील खड्ड्यांची रुंदी वाढत चाललेली असून खोल होत चालला. यामुळे येथे मोठा अपघात होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, हा पूल अत्यंत जुना असून गेल्या अनेक वर्षांपासून त्याची कोणतीही मोठी दुरुस्ती झालेली नाही. पुलाच्या पृष्ठभागावरील डांबर पूर्णपणे निघून गेले आहे, तर लोखंडी सळ्या उघड्या पडल्यामुळे अपघाताचा धोका अधिक वाढला आहे. गरोदर महिला, शाळकरी विद्यार्थी यांना तर मोठा धक्का समजला जातो. पावसाळ्यात या खड्ड्यांत पाणी साचल्यामुळे धोका दुप्पट वाढतो.

संबंधित एमएमआरडी, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अनेक वेळा तक्रारी करण्यात आल्या असल्या तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. नागरिकांनी प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त करत सांगितले की, एखादा जीव गेला कीच प्रशासन जागे होते.

स्थानिक ग्रामस्थांनी इशारा दिला आहे की, जर तातडीने पुलाची दुरुस्ती करण्यात आली नाही तर रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल.

# बेलवाडी-झापडी परिसरात दोन गावठी दारू भट्ट्या उद्ध्वस्त

## १.६९ लाखांचे साहित्य केले नष्ट

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा पोलीस ठाणे हद्दीतील मौजे बेलवाडी व झापडी गावाच्या जंगल परिसरात सुरू असलेल्या गावठी हातभट्टीच्या दारू निर्मितीवर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. या कारवाईत तब्बल १.६९ लाख रुपये किमतीचा प्रोव्हेशनचा माल नष्ट करण्यात आला असून दोन व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रोहा पोलीस ठाण्याचे अधिकारी व स्टाफला खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर त्यांनी दोन पंचांच्या उपस्थितीत बेलवाडी गावच्या जंगल परिसरात धाड टाकली. पाण्याच्या ओहळाजवळ काळ्या रंगाच्या ताडपत्रीखाली लपवून ठेवलेल्या जागी पोलिसांना दारू तयार करण्यासाठी लागणारे रसायन, लाकडे, भांडी आणि



पाच प्लास्टिक पिंप आढळून आले.

या ठिकाणाहून १००० लिटर रसायन व १० लिटर तयार गावठी दारू, अशी एकूण ७१,००० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. पोलिसांनी काही नमुने रासायनिक विश्लेषणासाठी पंचनामा करून जप्त केले. या ठिकाणी उपस्थित असलेल्या नितेश गोरे (रा. बेलवाडी, ता. रोहा) याने सदर भट्टी त्याचीच असल्याचे कबूल केले.

यानंतर पोलिसांनी झापडी गावाजवळील जंगल भागात दुसरी धाड टाकली. येथेदेखील पाण्याच्या ओहळाजवळ ताडपत्रीखाली १४०० लिटर रसायन व सात पिंपांसह दारू तयार करण्याचे साहित्य मिळून आले. ९८,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, ठिकाणी मिळालेल्या सुधीर गोरे (रा. झापडी, ता. रोहा) यानेही सदर भट्टी त्याची असल्याचे सांगितले.

दारू निर्मितीचे ठिकाण डोंगराळ व वाहतुकीस अवजड असल्याने पोलिसांनी पंचांच्या उपस्थितीत दोन्ही भट्ट्या फोडून नष्ट केल्या.

दोन्ही व्यक्तींविरुद्ध गावठी दारू निर्मिती व विक्रीबाबत गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने केली.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून रस्त्यांचे काँक्रीटीकरण

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते कामाचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील देवद ग्रापंचायतीमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीमधून रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी (दि.११) झाले.

पनवेल मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली विकासकामांचा झंझावात सुरू आहे. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आमदार निधी आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत १० लाख रुपयांच्या निधीमधून देवदे येथे शिवनगर अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण तसेच १० लाख रुपयांच्या निधीमधून शिवनगर येथे दत्त रेसीडेन्सी ते भगवान भंडारी यांच्या घरापर्यत्तच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी झाले.

या वेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, भाजपनेते एकनाथ देशेकर, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, तालुका चिटणीस यतीन पाटील, सरपंच विनोद वाघमारे, उपसरपंच साधना वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य संदिप वाघमारे, दिनेश वाघमारे, विजय वाघमारे, भगवान भंडारे, वासुदेव वाघमारे, प्रितम वाघमारे, प्रविण वाघमारे, कैलास वाघमारे, राम वाघमारे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# घरोशीवाडीतील ग्रामस्थांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड-रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे खासदार सुनील तटकरे व राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या विकासकामांनी प्रभावित होऊन महाड विधानसभा मतदार संघातील माणगाव तालुक्यातील निजामपूर विभागातील पळसगाव ग्रामपंचायत हद्दीतील घरोशीवाडी येथील ग्रामस्थांनी विभागातील राष्ट्रवादीचे नेते बाबुशेठ खानविलकर, नरेश तटकरे व गणेश ढवळे, सरपंच अशोक पाटील



यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवीत नुकताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

या वेळी घरोशीवाडीतील ग्रामस्थ प्रमुख जयदास भाऊ शांताराम भिसे यांच्याबरोबर नामदेव जाधव, किशोर भिसे, पांडुरंग भिसे, कमलेश गावाने सतीश गावाने, प्रकाश भिसे, रवींद्र भिसे, शिवदास भिसे, नितेश गावडे, रविंद्र गावडे, प्रकाश उतेकर आदी ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याची माहिती पक्षाचे महाड विधानसभा मतदार संघाचे माजी अध्यक्ष बाबूशेठ खानविलकर यांनी माध्यमांजवळ बोलताना दिली.

# लोकलने तीन बैलांना उडवले

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीहून मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे सायंकाळी ६.०२ वाजता सुटणारी लोकल गाडी केलवली ते पळसदरी स्थानकादरम्यान १०४/२० किमी जवळ अचानक ट्रॅकवर आलेल्या तीन बैलांना धडकली. या अपघातात दोन बैलांचा मृत्यू झाला असून एक बैल गंभीर जखमी झाला आहे. मृत बैल लोकलच्या चाकाखाली अडकून पडल्याने गाडी तब्बल दीड तास ट्रॅकवरच थांबून राहिली.

या दरम्यान गाडीतल्या प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. कर्जत व पळसदरीकडे जाणाऱ्या अनेक प्रवाशांनी थेट रेल्वे लाईनवरून चालत प्रवास सुरू केला. रेल्वे कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत अडकलेल्या बैलाला बाहेर काढण्याचे प्रयत्न केले आणि अखेर दीड तासानंतर लोकलला पुढे मार्गस्थ करण्यात यश आले.

अपघातामुळे या लोकलला कर्जत स्टेशनवरच रद्द करण्यात आले. कर्जतवरून सुटणाऱ्या ७.४३ मिनिटांच्या लोककला थांबवून प्रवाशांना मुंबईच्या दिशेने पाठविण्यात आले. रात्री ८ वाजता ही लोकल कर्जत स्थानकावर पोहचली.

# उरण मुळेखंड येथे आरोग्य शिबिर

**उरण : वार्ताहर**

ज्येष्ठ नागरिक मंडळ, मुळेखंड, तेलीपाडा, कोळीवाडा, कुंभारवाडा व परिसर आणि शुश्रूषा हार्ट केअर सेंटर पनवेल व स्पेशालिटी हॉस्पिटल, नेरूळ यांच्या संयुक्त विद्यमाने आणि डॉ. याशिका म्हात्रे, मुळेखंड यांच्या सौजन्याने ज्येष्ठ नागरिक मंडळ विरंगुळा केंद्र, मुळेखंड फाटा, येथे नुकताच मोफत आरोग्य शिबिर, भरविण्यात आले.

या शिबिरामध्ये एकूण ८३ नागरिकांनी ई.सी.जी. (ECG), उच्च रक्तदाब व शुगर (मधुमेह) टेस्ट (तपासणी) करून घेतली. आरोग्य शिबीर कार्यक्रम पार पाडण्यास डॉ. क्षीरसागर (कार्डीओलॉजिस्ट),



रत्नमाला भामरेकर, संजय गडकर व डॉ. याशिका म्हात्रे तसेच ज्येष्ठ नागरिक मंडळाचे कार्याध्यक्ष सर्वश्री अनंत ल. पाटील, अध्यक्ष प्रकाश पां. म्हात्रे, सचिव परशुराम बु. पाटील, उपाध्यक्ष अंकुश रामा म्हात्रे, खजिनदार ईश्वर बा. म्हात्रे, सहसचिव सुभाष दा. गुरव, कार्यकारिणीचे सदस्य हरिश्चंद्र द. म्हात्रे, कमळाकर मो. म्हात्रे आणि केशव ना. म्हात्रे या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. सरते शवेटी अनंत पाटील यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम पार पाडण्यात आला.

# उरण तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याध्यक्षपदी अजित पाटील

**उरण : बातमीदार**

उरण तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याध्यक्षपदी उरण तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार अजित पाटील यांची निवड करण्यात आली आहे.

राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे आणि कार्याध्यक्ष अशोक भोपतराव यांच्या प्रमुख उपस्थितीत रानसई येथे झालेल्या उरण पनवेल तालुक्यातील कार्यकर्त्यांच्या समन्वय बैठकीत या पदांचे पत्र अजित पाटील यांना देण्यात आले. या वेळी व्यासपीठावर प्रदेश चिटणीस मनोज भगत, कोकण संघटक रूपेश पाटील, उरण तालुका अध्यक्ष परिक्षीत ठाकूर, तेजस डाकी आदी उपस्थित होते. या वेळी जिल्हा सरचिटणीस पदावर दिपक माळी यांची रायगड जिल्हा उपाध्यक्ष भूषण ठाकूर, उरण तालुका ओबीसी सेलचे अध्यक्ष मच्छिंद्रनाथ ठाकूर,



रायगड जिल्हा सरचिटणीस रमण कासकर, उरण विधानसभा सरचिटणीस निलेश पाटील आदींच्या निवडीदेखील जाहीर करण्यात आल्या.

या वेळी पनवेल तालुक्यातील उबाठा सेनेचे उपतालुकाप्रमुख विठ्ठल मुंगाजी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला.

# किल्ले बांधणी स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील मजगांवच्या श्री शिवभक्त मित्र मंडळाने विद्यार्थ्यांसाठी दिवाळीच्या सुट्टीत तालुकास्तरीय किल्ले बांधणी स्पर्धा आयोजित केली होती. या किल्ले बांधणी स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा मजगावच्या विठ्ठल मंदिरात नुकताच पार पडला. या कार्यक्रमाची सुरुवात शिव प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या कार्यक्रमास विघ्नेश माळी, ऋषीकांत डोंगरीकर, यशवंत पाटील,जयेंद्र काबूकर, केतन नाक्ती इतर मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेतील विजेत्यांमध्ये छोटा गट प्रथम क्रमांक पार्थव भेर्ले किल्ले पन्हाळा (वडघर) द्वितीय अर्णव काटकर- किल्ले - प्रतापगड (वळके) तृतीय अर्चित ठाकूर



किल्ले पद्मदुर्ग (खारिकवाडा) उत्तेजनार्थ हिमांशू पाटील सिंधुदुर्ग (आदाड ) कुशल गुंड- पद्मदुर्ग (आदाड); मोठा गट प्रथम क्रमांक शौर्य मोकल - किल्ले रायगड, द्वितीय सोहम भेर्ले -पद्मदुर्ग (वडघर) तृतीय क्रमांक विभागून - आर्यन मसाल किल्ले पन्हाळा (मसाल गल्ली मुरुड) - वेदांत तळेकर - किल्ले राजगड (कुंभार वाडा - यश पाटील किल्ले जंजिरा (साळाव) उत्तेजनार्थ - दर्शन कमाने राजगड ( खार आंबोली) कुलाबकर किल्ले पद्मदुर्ग (मुरुड कोळीवाडा) आहेत.

कार्यक्रमामध्ये मुरूड पोलिसांनी आयोजित केलेल्या एकता मॅरेथॉन स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या सर्वेश काबुकर व हरियाणा व धुळे येथे झालेल्या कराटे स्पर्धेत रेश्मा भोईर व काव्या नाक्ती यांचा सत्कार करण्यात आला. विघ्नेश माळी यांनी सांगितले की, शिवरायांचा इतिहास व किल्ले हे आजच्या काळात आपण जपले पाहिजे केले संवर्धन केले पाहीजेत. कार्यक्रमाला शिवभक्त मित्र मंडळाचे अध्यक्ष नाथा भाऊ गिरणेकर, सिध्देश बेडेकर, सुबोध पाटील, नितीन मानाजी , दिपेश पाटील, सार्थक शेडगे, शनिकेत भोईर व इतर सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशिष बुल्लु यांनी केले तर आभार नितीन मानाजी यांनी मानले.

# श्रीजन २०२५ आंतरशालेय विज्ञान स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

टिळक पब्लिक स्कूल, नेरूळ येथे ८ नोव्हेंबर २०२५ रोजी श्रीजन २०२५ या आंतरशालेय विज्ञान प्रकल्प स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. टिळक ग्रुप ऑफ स्कूल्स अँड कॉलेजेसचे संचालक डॉ. अजित कुरूप यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे कौतुक केले आणि अशा व्यासपीठांमुळे ज्ञानाचे व्यावहारिक उपयोगाशी सेतूबंध निर्माण होत असल्याचे सांगितले.

प्राचार्या भुवनेश्वरी राजशेखर यांनी भाषणात विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे कौतुक करत त्यांना जिज्ञासेला उद्दिष्टपूर्ण नवसर्जनात परिवर्तित




करण्याचे आवाहन केले. एक्प्लोरिंग बियाँड बुक्स या विषयावर आधारित ५० शाळेतील २०० विद्यार्थ्यांनी सादर केलेले १०० पेक्षा अधिक प्रकल्प होते. प्रकल्पांचे परीक्षण बीएआरसीचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. अरूप बिस्वास आणि एचबीसीएसईचे प्रकल्प सहाय्यक गांधाली गिम्हवणेकर यांनी केले.

ग्रुप 'ए' न्यू होरायझन पब्लिक स्कूल ऐरोली यांनी प्रथम क्रमांक मिळवला. दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर अनुक्रमे एसबीओ पब्लिक स्कूल नेरूळ, आणि रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर यांनी स्थान मिळवले. ग्रुप 'बी' मध्ये एस एन जी स्कूल उलवे यांनी विजेतेपद पटकावले, तर दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर अनुक्रमे डीएवी पब्लिक स्कूल नेरूळ आणि विश्वजीत हायस्कूल खारघर यांनी स्थान मिळवले. तर ग्रुप 'सी' मध्ये प्रेझेंटेशन स्कूल नेरूळ विजेतेपद पटकावले, तर डीएवी पब्लिक स्कूल ऐरोली आणि एस एन जी इंटरनॅशनल स्कूल उलवे यांनी स्थान मिळवले. आणि 'डी' मध्ये सेंट मेरीज जुनियर कॉलेज वाशी यांनी प्रथम क्रमांक मिळवला. तर दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर एपीजे स्कूल खारघर आणि एसबीओए पब्लिक स्कूल नेरूळ, यांनी स्थान मिळवले तर सर्वोत्कृष्ट शाळा हा मानाचा किताब एसबीओए पब्लिक स्कूलने जिंकला.

# गव्हाण विद्यालयात राष्ट्रीय शिक्षण दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये राष्ट्रीय शिक्षण दिनाचे औचित्याने देशाचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

मंगळवार ११ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या या कार्यक्रमात विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांचे हस्ते मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला



पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर.पाटील, इयत्ता पाचवी अ च्या वर्गशिक्षिका उज्ज्वला म्हात्रे तसेच चारुशीला ठाकूर, विशांत ठाकूर, सोनाली घरत आणि विद्यार्थी उपस्थित होते. इयत्ता पाचवी अ या वर्गाच्या वतीने हा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

( पान ५ वरुन)

xxx. Violation of any of these conditions will amount to violation of Van (Sanrakshan Evam Samvardhan) Adhiniyam, 1980 and action would be taken as prescribed in para 1.16 of consolidated guidelines and clarifications issued under Van (Sanrakshan Evam Samvardhan) Adhiniyam, 1980 as issued by this Ministry on dated 29.12.2023;

xxxi. The State Government and user agency shall ensure compliance to all conditions stipulated in the 'In-principle approval letter of even no. dated 02.08.2024 for which undertakings have been obtained from the user agencyand also the provisions of the all Acts, Rules, Regulations and Guidelines, relevant Hon'ble Court Order (S) and NGT Order (S), if any, for the time being in force, including compliance of the Schedule Tribes, and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forests Rights) Act, 2006;

xxxii. As per Sub-rule 7 of Rule 11 of Van (Sanrakshan Evam Samvardhan) Rules, 2023 the State Govt, after receiving the 'Final' approval of the Central Government under sub-section (1) of section 2 of the Van (Sanrakshan Evam 8-34/2022-FC 1/113894/2025 Samvardhan) Adhiniyam, 1980 and after fulfilment and compliance of the provisions of all other Acts and rules made thereunder, as applicable including ensuring settlement of rightsunder the Scheduled Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forest Rights) Act, 2006 (2 of 2007), shall issue order for diversion of forest land.

**SCHEDULE**

| Sr. No. | Item Of Work / Purpose | Taluka | Village | Compt. No. | Survey No. | Gut No. | Area (In Ha.) | Status |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Submergence | Alibag | Mahan | 210 | | | 02-84-66 | Reserved Forest |
| | | | | 197 | | | 01-02-96 | |
| | | | | 199 | | | 08-94-74 | |
| | | | | 199 | | | 10-93-62 | |
| | | | | 200 | | | 03-35-14 | |
| | | | | 201 | | | 15-47-96 | |
| | | | | 201 | | | 00-79-24 | |
| | | | | 195 | | | 20-44-26 | |
| | | | | 196 | | | 62-97-74 | |
| | | | | 197 | | | 39-45-87 | |
| | | | | | 26/0 | 54 | 08-02-00 | Reserved Forest (IFA, 1927 U/S 4) |
| | | | | | 81/0 | 135 | 09-96-00 | |
| | | | | | 73/0 | 125 | 01-73-43 | |
| | | | | | 51/0 | 94 | 07-66-90 | |
| | | Alibag | Mahan | | 47/P | 91 | 07-79-53 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 54/0 | 98 | 01-18-00 | |
| | | | | | 57/0 | 103 | 00-37-00 | |
| | | | | | 109/1, | 177/P | 05-77-83 | Reserved Forest U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 107/0 | 175 | 01-96-30 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 109/2 | 175 | 00-40-00 | |
| | | | | | 68/0 | 110/P | 08-49-84 | Reserved Forest U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 97/1B | 167 | 00-27-00 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 22/2 | 52/P | 01-26-00 | |
| | | | | | 22/1 | 53/P | 03-08-00 | |
| | | | | | 31/2/1 | 60 | 00-51-00 | |
| | | | | | 31/2/3, 31/2/4, 31/2/6 | 61/P | 00-54-00 | |
| | | | | | 31/2/5 | 62 | 00-30-00 | |
| | | | | | 31/4 | 71 | 00-27-00 | |
| | | | | | 97/1A | 168 | 01-06-00 | |
| | | | | | 97/2 | 169/P | 01-35-00 | |
| | | | | | 59/0 | 105 | 00-53-00 | |
| | | | | | 61/0 | 108 | 01-82-00 | |
| | | | | | 15/1C | 36 | 01-66-00 | |
| 2 | Submergence | Pen | Shihu | 211 | | | 04-92-98 | Reserved Forest |
| | | | | 210 | | | 01-03-15 | |
| 3 | Dam seat | Alibag | Mahan | 195 | | | 03-87-08 | Reserved Forest |
| | | | | | 109/1 | 177/P | 01-55-12 | Reserved Forest U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 120/2 | 180/P | 00-07-08 | |
| | | | | | 120/3 | 178 | 01-16-00 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 15/5B | 32 | 00-16-00 | |
| | | | | | 15/2 | 33/P | 00-05-00 | |
| | | | | | 15/5/A | 34/P | 00-53-00 | |
| | | | | | 15/1B | 35/P | 00-11-14 | |
| | | | | | 9/6 | 28 | 00-52-00 | |
| | | | | | 15/4 | 31 | 00-03-00 | |
| | | | | | 15/5C | 27/P | 00-04-00 | |
| | | Alibag | Mahan | | 9/7 | 15/P | 00-20-78 | Reserved Forest U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 15/3 | 24 | 00/03/00 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| 4 | Waste Weir | Alibag | Mahan | 201 | | | 05-09-21 | Reserved Forest |
| 5 | Tail Channel | Alibag | Mahan | | 115/0 | 185 | 00-16-20 | Restored To Owner U/S 22 A |
| | | | | | 120/7 | 186 | 00-79-00 | |
| 6 | Approach Road | Alibag | Mahan | | 120/20 | 199 | 00-14-84 | Of MPF Act 1975 |
| | | | | | 120/23 | 203 | 00-09-56 | |
| 7 | Approach Road | Alibag | Ramraj | | 54/0 | 112 | 02-60-29 | Reserved Forest U/S 22 A Of MPF Act 1975 |
| 8 | Left Pipe Distribution Network | Alibag | Mahan | | 120/23 | 203/P | 00-09-54 | Restored To Owner, U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | Ramraj | | 54 | 112/P | 01-75-94 | Reserved Forest U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 85/1 | 195/P | 00-84-98 | Finally Acquired Private Forest U/S 22 A MPF Act 1975 |
| | | | | | 85/2 | 193/P | 00-04-71 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 116 | 282/P | 00-49-87 | |
| | | | Malade | | 7/12 | 13/P | 00-20-68 | Reserved Forest (IFA, 1927 U/S 4) |
| 9 | Right Pipe Distribution Network | Alibag | Mahan | | 9/7 | 15/P | 00-01-22 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 9/1 | 258/P | 00-06-33 | |
| | | | | | 145 | 246/P | 00-16-50 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 138/1 | 230/P | 00-01-83 | |
| | | | Moronde | | 3/1,3/2B, | 100/P | 00-14-89 | |
| | | | Umate | | 20/4 | | 00-02-35 | |
| | | | | | 42/P | | 00-30-27 | |
| | | | | | 43/P | | 00-02-69 | |
| | | | | | 49/P | | 00-32-69 | |
| | | | | | 13/P | | 00-46-23 | |
| | | | Borghar | | 54/P | 208/1,2 | 00-25-66 | |
| | | | | | 55/P | Forest | 00-62-00 | |
| | | | | | 59 | 214/P | 00-03-86 | |
| | | | Beloshi | | 190/2 | 454/P | 00-11-43 | |
| | | | | | 190/1 | 455/P | 00-10-42 | |
| | | | Mahajane | | 82/1/A | 294/P | 00-04-02 | Reserved Forest U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 82/1B | 293/P | 00-03-26 | |
| | | | | | 74/3 | 287/P | 00-03-52 | |
| | | | | | 74/1 | 235/P | 00-08-94 | |
| | | | | | 63/0 | 223/P | 00-25-58 | Reserved Forest (IFA, 1927 U/S 4) |
| | | | | | 71/1B | 190/P | 00-00-62 | |
| | | | | | 68/4 | 180/P | 00-06-46 | |
| | | | | | 8/0 | 25/P | 00-30-88 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 24/0 | 68/P | 00-17-33 | |
| | | | | | 44/0 | 179/P | 00-17-14 | |
| | | | | | 81/1 | 295/P | 00-28-74 | |
| | | | Valvali | | 70/2 | | 00-18-76 | Reserved Forest (IFA, 1927 U/S 4) |
| | | | | | 66/P | | 00-19-20 | |
| | | | Malyan | | 20/1+2+3 | 83/P | 00-07-43 | |
| | | | | | 441/P | | 00-01-64 | Reserved Forest (IFA, 1927 U/S 4) |
| | Total forest Land (in Ha.) | | | | | | 263-54-06 | |

The above cited letter of In-principle & Final approval is available on Central Government website www.parivesh.nic.in and Government of Maharashtra Order is available on Government of Maharashtra's website www.maharashtra.gov.in with Reference No. 202511061555482419

Date: 13/11/2025
Place: Kamarli, Tal.Pen

क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/२४८/१५८१/२०२५
दिनांक :-११/११/२०२५

**Sd/-**
**Executive Engineer,**
**Hetawane Medium Project Division,**
**Kamarli, Tal-Pen, Dist.- Raigad.**

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

## निविदा मागविणे साठी जाहीर निवेदन

**सुरक्षा रक्षक पुरवठादारांकडून भुमि गार्डनिया सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., भूखंड क्र. ७, सेक्टर १७, रोडपाली - कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड, नवी मुंबई ४१० २१८** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतूदीनुसार नोंदलेली संस्था असून तिचा नोंदणी क्र. एनबीओएम / सिडको / एचएसजी / (टीसी ) ६८१७ / जेटीएआर / सन २०१६-२०१७ असा आहे. या संस्थेच्या सुरक्षेसाठी सुरक्षा, रक्षक पुरवठा करणाऱ्या, ज्यांना या क्षेत्रातील कमीत कमी पाच (५) वर्षे अनुभव असून सेवा चालविण्यासाठी आवश्यक असणारे शासन मान्यताप्राप्त परवाना व इतर कागदपत्रे असणाऱ्या ठेकेदाराकडून बंद लिफाफ्यात निविदा मागविण्यात येत आहेत. तरी सुरक्षा-रक्षक पुरवठादारांनी हि नोटीस प्रसिध्द झाले पासून १० दिवसात संस्था कार्यालयात कार्यालयीन वेळेत बंद लिफाफ्यात अटी व शर्तीसह जमा कराव्यात.

सदरच्या निविदा प्रक्रियेतील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे व कोणतीही पूर्व सूचना न देता निविदा प्रक्रिया खंडीत करण्याचे अधिकार संचालक मंडळाने राखून ठेवले आहेत.

दि. १२/११/२०२५

**सही/- सही/- सही/-**
**अध्यक्ष, सचिव, खजिनदार व व्यवस्थापक समिती**

भुमि गार्डनिया सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,
भूखंड क्र. ७, सेक्टर १७, रोडपाली- कळंबोली, ता. पनवेल,
जि. रायगड, नवी मुंबई ४१० २१८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने आमचे अशिल श्री. नामदेव सिताराम कातकरी, श्री. मनोहर शिमग्या वाघमारे, श्री. मारुती लाहण्या कातकरी, रामदास मोतीराम वाघमारे, बंदू सोमा कातकरी, दिलीप काणू नाईक वगैरे सर्व रा. भेरले, पो. चिखले, ता. पनवेल, जि. रायगड यांचे मार्फत कळविण्यात येते की,

मौजे. मोहपे ता. पनवेल, जि. रायगड येथील दळी प्लॉट नं. २९, स. नं. ६६, हिस्सा नं. ०, क्षेत्र ८-९८-०० ही मिळकत असून ती आमचे अशिलांचे ताबे कब्जा वहिवाटीत त्यांच्या वाडवडीलांपासून वर्षानुवर्षे आहे. सदर मिळकतीशी वरील मिळकतीशी व पांडूरंग गोपीनाथ कातकरी, कुंदा पांडूरंग कातकरी, मधूकर किसन कातकरी, ताराराम वाघमारे कातकरी, रा. भेरले यांचा काडीमात्र संबंध नाही. मात्र असे असतानाही आमचे अशिल रामदास मोतिराम वाघमारे यांच्या निदर्शनास एका मित्राने एक पेपर नोटीस ॲड. पोटे यांच्या मार्फत प्रसिद्ध झालेली दाखविली व वरील मिळकत त्यांचे अशील विकत घेणार आहेत कोणाचेही कसलीही हरकत असल्यास त्यांनी हरकत नोंदवावी असे त्या नोटीस मध्ये नमुद होते. आमचे अशिलांनी त्या संदर्भात त्यांची हरकत संबंधीत वकीलांकडे घेतलेली आहे.

वर नमूद केल्या प्रमाणे सदर मिळकत ही आमचे अशिलांच्या ताबे कब्जा वहिवाटीत आहे. ती विक्री करण्याचा अथवा त्या मध्ये कोणाही इसमाचा कसल्याही प्रकारे हक्क अधिकार करण्याचा अधिकार पांडूरंग कातकरी वगैरे यांस नाही.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये तो केल्यास आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही/ तसेच तो बेकायदेशीर होईल. तसेच आमचे अशिल सदर मिळकतीचा ताबा त्या इसमांस देणार नाहीत याची नोंद घ्यावी.

पनवेल,
दि. ११/११/२०२५

**सही/-**
**ॲड. प्रविण मधूकर ठाकूर**

गाळा नं. १, भाईजी अपार्टमेंट, सहस्त्रबुद्धे हॉस्पीटल समोर, पनवेल,
जि. रायगड. मो ९८२२०४८३३८.

# जम्मू काश्मीरच्या संघाने इतिहास रचला!

## रणजी ट्रॉफीत पहिल्यांदाच बलाढ्य दिल्लीचा पराभव



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रणजी ट्रॉफी २०२५ स्पर्धेत मंगळवारी (दि. ११) जम्मू काश्मीरच्या संघान इतिहास रचला. त्यांनी रणजी इतिहासातील दिग्गज म्हणून गणल्या जाणाऱ्या दिल्लीला सात विकेट्सने मात दिली. सहा दशकात पहिल्यांदाच जम्मू काश्मीरने दिल्लीचा पराभव केला आहे. या ऐतिहासिक विजयानंतर जम्मू काश्मीरचा संघ एलीट ग्रुप डी मध्ये दुसऱ्या स्थानावर पोहचला आहे. या ग्रुपमध्ये पहिल्या स्थानावर मुंबई आहे.

दिल्लीने जम्मू काश्मीरसमोर विजयासाठी १७९ धावांचे आव्हान ठेवले होते. याचा पाठलाग करताना जम्मू काश्मीरचा सलामीवीर कमरान इकबालने नाबाद १३३ धावांची दमदार खेळी केली. ही त्याची कारकीर्दीतील आतापर्यंतची सर्वोच्च खेळी ठरली. त्याने आपल्या खेळीत संयम आणि तंत्रशुद्धतेच दर्शन घडवले. त्याच्या या खेळीसमोर दिल्लीचे कसलेले गोलंदाज निष्प्रभ ठरले. सुरुवातीला दबावात खेळणाऱ्या इकबालने शेवटपर्यंत क्रीज सोडले नाही. तो संघाला विजय मिळेपर्यंत टिकून राहिला.

सामन्याबद्दल बोलायचे झाले तर जम्मू काश्मीरच्या गोलंदाजींनी सामन्यावर वर्चस्व राखल. पहिल्या डावात औकीब नबीने ३५ धावात पाच विकेट्स घेतल्या. त्यामुळं दिल्लीचा संघ अवघ्या २११ धावाच करू शकला. त्यानंतर दुसऱ्या डावात दिल्लीने झुंज दिली, मात्र वंशज शर्माने ६८ धावात सहा विकेट्स घेत दिल्लीच्या फलंदाजांना वेसण घातली.

दिल्लीकडून आयुष बदोनीने दमदार फलंदाजी करत एकाकी झुंज दिली. त्याने दोन्ही डावात अर्धशतकी खेळी केली. त्याला हर्षित दोसजाने ६५ धावा करत चांगली साथ दिली, मात्र त्यानंतर दिल्लीच्या इतर फलंदाजांना फारशी चांगली कामगिरी करता आली नाही. जम्मू काश्मीरच्या भेदक गोलंदाजीसमोर त्यांचा टिकाव लागला नाही.

पहिल्या डावात जम्मू काश्मीरचा कर्णधार पारस डोगराने १०६ धावांची दमदार खेळी केली, तर अब्दुल समदने ८५ धावांची धुंवाधार खेळी करत संघाला ३१० धावांपर्यंत पोहचवले. इथेच विजयाची त्यांनी पायाभरणी केली होती.

**संक्षिप्त धावफलक**

दिल्ली पहिला डाव २११ धावा व दुसऱ्या डावात २७७ धावा, जम्मू काश्मीर पहिला डाव ३१० धावा व दुसऱ्या डावात ३ बाद १७९ धावा.

# 'खेलो इंडिया' अंतर्गत कळंबोली येथे रायगड जिल्हा अस्मिता ॲथलेटिक्स लीग

## १७ नोव्हेंबरला उद्घाटन, ललिता बाबर यांची लाभणार उपस्थिती

**पनवेल : वार्ताहर**

केंद्र शासनाच्या खेलो इंडिया या उपक्रमांतर्गत भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि भारतीय ॲथलेटिक्स फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अस्मिता ॲथलेटिक्स लीग स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या लीगचे उद्दिष्ट महिलांचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग वाढवणे, ॲथलेटिक्सला प्रोत्साहन देणे आणि जिल्हास्तरावर तळागाळातील क्रीडा नैपुण्य विकसित करणे हे आहे.

या उपक्रमासाठी संपूर्ण देशातील ३०० जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून त्यामध्ये रायगड जिल्ह्याचाही समावेश आहे. रायगडासाठी ही स्पर्धा १७ नोव्हेंबर रोजी नवी मुंबई पोलीस मुख्यालय, कळंबोली येथे होणार आहे. या स्पर्धेच्या उद्घाटनास प्रमुख पाहुण्या म्हणून अर्जुन पुरस्कार विजेत्या ऑलिम्पिक खेळाडू ललिता बाबर उपस्थित राहणार आहेत.




स्पर्धा १४ वर्षाखालील मुली आणि १६ वर्षाखालील मुली या दोन गटांसाठी घेण्यात येणार असून रायगड जिल्ह्यातील ५०पेक्षा अधिक संस्थांमधील सुमारे ५०० ते ६०० खेळाडू सहभाग घेतील अशी अपेक्षा आहे. विशेष म्हणजे या स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही.


स्पर्धेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंना प्रमाणपत्र आणि पदकांनी गौरविण्यात येईल तसेच एफआयद्वारे नियुक्त निवड पथक या स्पर्धेदरम्यान प्रतिभावान आणि भविष्यकाळात उत्कृष्ट कामगिरी करण्याची क्षमता असलेल्या खेळाडूंची निवड करणार आहे. या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील सर्व खेळाडूंनी या स्पर्धेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

स्पर्धेसाठी प्रवेशिका १४ नोव्हेंबर रोजी रात्री ११.३० वाजेपर्यंत https://forms.gle/m6gZ3edLoksxz1VF7 या लिंकवर भरता येतील. अधिक माहितीसाठी प्रवीण खुटारकर (९७७३५२५७७७) किंवा यतीराज पाटील (९९२११७१७००) यांच्याशी संपर्क साधावा तसेच अधिक माहिती raigadathletics.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असे कळविण्यात आले आहे.

# हिंद केसरी स्पर्धेसाठी विजय चौधरी पात्र

**पुणे : प्रतिनिधी**

भारतीय शैली कुस्ती महासंघ व महाराष्ट्र राज्य भारतीय कुस्ती संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रीय कुस्ती संकुल, वडकी (पुणे) येथे झालेल्या हिंदकेसरी निवड चाचणी कुस्ती स्पर्धेत नवी मुंबई पोलीस दलातील सहाय्यक आयुक्त तसेच सलग तीन वेळा महाराष्ट्र केसरी विजेते आणि जागतिक पोलीस सुवर्णपदक विजेते पैलवान विजय चौधरी यांनी दमदार खेळी करत हिंदकेसरी स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.



येत्या १५ ते २० जानेवारी २०२६ रोजी सातारा जिल्हा येथे होणाऱ्या हिंद केसरी स्पर्धे साठी चौधरी यांची अधिकृत निवड जाहीर करण्यात आली आहे. निवड चाचणीदरम्यान चौधरी यांनी चार सलग कुस्त्यांमध्ये विजय मिळवत आगेकूच केली. त्यांनी खेळलेल्या प्रेक्षणीय कुस्त्यांना प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

चौधरी यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाराष्ट्र पोलीस दल तसेच नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे व सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

> *महाराष्ट्र पोलीस दलाच्या पोलिसिंग कर्तव्याबरोबरच खेळातसुद्धा महाराष्ट्र पोलीस हे नाव देशभर उज्ज्वल ठेवणे हा माझा ध्यास आहे. कुस्ती क्षेत्रातील मानाचा हिंद केसरी किताब महाराष्ट्र पोलीस दलाच्या नावावर करण्यासाठी मी सर्वस्वाने प्रयत्न करेन.*
> ***–विजय चौधरी,** सहाय्यक पोलीस आयुक्त*

# रायगड जिल्हा वुशू अजिंक्यपद स्पर्धेत सह्याद्री मार्शल आर्ट्स असोसिएशनचे यश

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव येथील क्रीडा संकुलात २०वी रायगड जिल्हा वुशू अजिंक्यपद स्पर्धा उत्साहात पार पडली. जिल्हाभरातील खेळाडूंनी प्रभावी कामगिरी सादर करत स्पर्धेत रंगत आणली. या स्पर्धेत सह्याद्री मार्शल आर्ट्स असोसिएशनच्या खेळाडूंनी द्वितीय क्रमांक पटकावले.

स्पर्धेस प्रमुख पाहुणे म्हणून किरण हिंगणे (डीएमसीसी मॅनेजर), श्री. कानेकर, श्री. पाटील (दीपक नायट्रेट), संतोष म्हात्रे, अमित दळवी आदी उपस्थित होते.



सह्याद्री मार्शल आर्ट्स असोसिएशनच्या स्वरा म्हात्रे, यज्ञेश मोरे, तुषार मोरे, पृथ्वी कोळी, जुई मोरे, रितेश कोळी, स्वरा अवसरे, अनुप नाकते, विहान कळव, आदित्य लोखंडे, वैदेही जाधव यांनी सुवर्ण; विघ्नेश प्रधान, विहान प्रधान, रिधान मोरे, श्लोक मोरे, विधान धारवे, सानवी खेरटकर, आदिती धामणसे, स्वरा सानप, आरुष सानप, सात्विक बीरगावले, शौर्य धामणसे, श्लोक पानसरे यांनी रौप्य; तर अमेय लोखंडे व वेद कदम यांनी करांस्यपदक जिंकले.

यशस्वी विद्यार्थ्यांना सह्याद्री मार्शल आर्ट्स संस्थापक राकेश पाटील तसेच त्यांचे सहकारी श्रीकांत ठाकूर, रोहित मोरे, रणजीत रेवाळे, ऋषाल गोवर्धने, किरण डाखवे, विशाल दलवे, ओंकार हजारे, रोहन मोरे, रिद्धी रेवाळे, रंजना शिंदे, मयुरेश सोनावणे यांनी मार्गदर्शन केले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात कुस्ती प्रमुख प्रतीक्षा सुतार यांच्यासह संपूर्ण टीमचे योगदान लाभले. सर्व विजेत्यांचा गौरव करत मान्यवरांनी कौतुक केले व उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## आमदार चषक क्रिकेट स्पर्धा



**पनवेल : कै. चंद्रकांत स्मृती आणि श्री कृष्ण स्पोर्ट्स नागझरी यांच्या वतीने भाजप युवा नेते महेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार चषक २०२५ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन नागझरी येथील मैदानात करण्यात आले आहे. या स्पर्धेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन उत्कृष्ट आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले तसेच खेळाडूंना प्रोत्साहित केले. या वेळी भाजप उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, एकनाथ देशकर, कृष्णाशेठ पाटील, प्रकाश खैरे, अशोक साळुंखे, महेश पाटील, नितेश पाटील, अरविंद गोंधळी, युवा मोर्चा पनवेल तालुका उत्तर अध्यक्ष आशिष कडू, निवृत्ती म्हात्रे, भारत म्हात्रे, रूपेश म्हात्रे, श्रीनाथ पाटील, अतुल पाटील, मेघनाथ पाटील आदी उपस्थित होते.**

# रिलायन्स नागोठणे मैदानावर रंगणार कूच बिहार ट्रॉफीतील सामना

## प्रशासनाकडून जय्यत तयारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाद्वारे (बीसीसीआय)तर्फे खेळवल्या जाणाऱ्या कूच बिहार करंडक १९ वर्षांखालील चार दिवसीय क्रिकेट स्पर्धेतील महाराष्ट्र विरुद्ध ओडिसा हा साखळी फेरीतील सामना १६ ते १९ नोव्हेंबर या कालावधीत नागोठणे येथील रिलायन्स क्रिकेट स्टेडियमच्या मैदानावर होणार आहे.

या सामन्यासाठी रिलायन्स नागोठणे प्रशासनाकडून जय्यत तयारी सुरू असून खेळाडूंसाठी सुसज्ज मैदान, सुरेख खेळपट्टी, चांगल्या दर्जाचे पॅव्हेलियन व सुरक्षा व्यवस्थेची पूर्तता करण्यात येत आहे. स्टेडियम व मैदानाच्या सर्व व्यवस्थेची पाहणी करण्यासाठी रिलायन्स नागोठणे विभागाचे अध्यक्ष शशांक गोयल, कॉर्पोरेट सर्व्हिसेसचे प्रमुख पुनीत मिश्रा, हॉर्टिकल्चर विभागाचे प्रमुख शरद पवार, सदस्य शांताराम करंजे, सिव्हिल डिपार्टमेंटचे प्रतिनिधी इस्माईल पिट्टू, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष राजेश पाटील, सहसचिव जयंत नाईक, सदस्य ॲड.पंकज पंडित, शंकर दळवी, संदीप जोशी उपस्थित होते.

सामना सर्व दर्शकांसाठी विनामूल्य असणार आहे. जिल्ह्यातील सर्व अकॅडमी व क्लबच्या खेळाडूंसह क्रिकेटप्रेमी दर्शकांनी सामना पाहण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांनी केले आहे.

# गोवा आयर्नमॅन स्पर्धेत महाराष्ट्राचा हर्षवर्धन परदेशी यशस्वी





**पणजी : वृत्तसंस्था**

गोव्यातील पणजी येथे आयर्नमॅन ७०.३ या आव्हानात्मक ट्रायथलॉन स्पर्धेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. यामध्ये हर्षवर्धन रवींद्र परदेशी या युवकाने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करून स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण केली.

जगभरातील ६२ देशांमधून एकूण १२७० स्पर्धक या खडतर स्पर्धेत सहभागी झाले होते. स्पर्धेत १.२ मैल (१.९ किमी) पोहणे, ५६ मैल (९० किमी) बाईक राइड आणि १३.१ मैल (२१.१ किमी) धावणे समाविष्ट होते. ही स्पर्धा पूर्ण करण्यासाठी साडेआठ तासात हे अंतर पूर्ण करणे आवश्यक असते. हर्षवर्धनने हे आव्हान केवळ सात तास १० मिनिटांत पूर्ण केले.

स्पर्धेला गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत आणि ब्रँड ॲम्बेसेडर सैयामी खेर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवण्यात आला. बंगळुरू दक्षिणचे खासदार तेजस्वी सूर्या आणि तामिळनाडूतील भाजपचे माजी आयपीएस अधिकारी व सध्याचे उपाध्यक्ष अन्नामलाई कुप्पुसामी यांचाही स्पर्धा पूर्ण करणाऱ्यांमध्ये सहभाग होता. विशेष म्हणजे या स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या होत्या. या यशाबद्दल हर्षवर्धनचे अभिनंदन होत आहे.






**उलवे नोड : योनेक्स सनराईज द्वितीय महाराष्ट्र सिनिअर स्टेट सिलेक्शन रामशेठ ठाकूर ट्रॉफी बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन मंगळवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी स्पर्धेचे संयोजक व बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगडचे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मनोगत व्यक्त करून बॅडमिंटन खेळाचा आनंद घेतला. सोबत इतर मान्यवर.**

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे जिल्हास्तरीय सेपक टकरा स्पर्धेत यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाने जिल्हास्तरीय सेपक टकरा क्रीडा स्पर्धेत व्दितीय क्रमांक पटकाविला.

या स्पर्धेचे आयोजन राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत, रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी, अलिबाग व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. यामध्ये रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील साध्वी अभय पाटील, नम्रता सुनील सलते, सायली हनुमंत पाटील, निर्मिती निलेश नाखवा, अवनी राजेंद्र काळे या विद्यार्थ्यांच्या संघाने १९ वर्षाखालील गटात व्दितीय क्रमांक प्राप्त केला. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील आणि महेंद्र पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, कार्यकारी मंडळ संचालक संजय भगत, सचिव डॉ.एस.टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, प्राचार्य निशा नायर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com